# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१७

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**बुधवार, दिनांक ०८ मार्च, २०१७ / फाल्गुन १७, १९३८ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| (१) | महसूल, पुनर्वसन व मदत कार्य, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री | यांचे प्रभारी विभाग |
| (२) | परिवहन, खारभूमी विकास मंत्री | |
| (३) | कृषी आणि फलोत्पादन मंत्री | |
| (४) | सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री | |
| (५) | पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यविकास मंत्री | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### कोच्छी बॅरेज (जि.नागपूर) प्रकल्पातील प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाबाबत

**(१) * ७९४२९ श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावनेर (जि.नागपूर) तालुक्यातील कोच्छी, खैरी, ढालगाव व जुनी रायवाडी ही गावे कन्हान नदीवरील कोच्छी बॅरेज प्रकल्पामुळे पाण्याखाली येणार असल्याने या परिसरातील सर्व शेतकरी व कामगारांचे पुनर्वसन पारडी (रिठी) व रायवाडी येथे करण्याची कार्यवाही सुरू असून या पुनर्वसनास शेतकऱ्यांसह कामगारांनी विरोध दर्शविला असल्याचे दिनांक ३१ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या परिसरातील शेतकऱ्यांचे हत्तीसार व कामगारांचे पारडी (रिठी) येथे पुनर्वसन करण्याची मागणी लोकप्रतिनिधींसह शेतकरी व कामगारांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शेतकऱ्यांचे हत्तीसार व कामगारांचे पारडी (रिठी) येथे पुनर्वसन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

(२) होय.

(३) व (४) या प्रकरणी संबधीत ग्रामपंचायतीस ग्रामसभेचा ठराव सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे. ग्रामसभेचा ठराव प्राप्त झाल्यावर पुनर्वसन आराखडा व भूसंपादन प्रस्ताव तयार करुन त्यानुसार पुनर्वसनाची कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नाशिक महसूल विभागात सुरु असलेले अवैध वाळू उत्खनन

**(२) * ७४३७१ श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.विजय औटी (पारनेर), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे जिल्हयातील पांझरा व तापी नदीपात्रातून दिवसरात्र अवैध वाळू उत्खनन करुन दुसऱ्या जिल्हयात वाहतूक केली जात असल्यामुळे शासनाच्या महसुलाचे तसेच पर्यावरणाचे नुकसान होत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच जळगांव जिल्हयात महसूल, पोलिस आणि परिवहन अधिकाऱ्यांच्या संगनमताने अवैधरित्या वाळू वाहतूक होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१६ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच अहमदनगर जिल्ह्यातील श्रीगोंदा तालुक्यातील भीमा नदी पात्रातून औटीवाडी तलावातून, पारनेर तालुक्यातील मुळा नदीच्या शेजारील देसवडे, मांडवा, तास व ढवळपूरी व संगमनेर तालुक्यातील जांबूत व साकूर या भागातून मोठ्या प्रमाणात बेकायदा वाळू उपसा होत असून संबंधित अधिकारी त्याकडे दुर्लक्ष करीत असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच नाशिक शहरातील गोदावरी नदीच्या पात्रातून बेकायदेशीरपणे वाळू उपसा होत असल्याने नव्याने बांधण्यात आलेल्या घाटांचेही नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन बेकायदेशीर वाळू उपसा करणाऱ्यांवर व त्यास जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३), (४) व (५) धुळे, जळगाव, अहमदनगर व नाशिक जिल्ह्यात गौण खनिजाच्या अवैध उत्खनन वाहतुकीची काही प्रकरणे दृष्टोत्पत्तीस आली आहेत.

तथापि, धुळे, जळगांव, अहमदनगर व नाशिक या जिल्हयांमध्ये गौण खनिजांच्या अवैध उत्खनन/वाहतूक रोखण्यासाठी जिल्हास्तरावर व तालुकास्तरावर भरारी पथकांची नियुक्ती करण्यात आली आहे.

धुळे जिल्हयातील भरारी पथकांनी माहे एप्रिल, २०१६ ते जानेवारी, २०१७ या कालावधीत केलेल्या तपासणीत गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतूकीच्या ३१९ प्रकरणात रु. ५६,१२,४३६/- एवढा दंड वसूल करून शासनजमा करण्यात आलेला आहे. तसेच २५ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

जळगाव जिल्हयातील भरारी पथकांनी माहे एप्रिल, २०१६ ते जानेवारी, २०१७ या कालावधीत केलेल्या तपासणीत गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतूकीच्या १९३४ प्रकरणात रु. २,६५,०५,०००/- एवढा दंड वसूल करून शासनजमा करण्यात आला आहे. तसेच ४० गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. जळगांव जिल्ह्यात महसूल, पोलीस व परिवहन अधिकाऱ्यांच्या संगनमताने वाळूची अवैध वाहतूक होत असल्याचे निदर्शनास आले नाही.

अहमदनगर जिल्ह्यातील श्रीगोंदा तालुक्यातील भिमा नदी, औटीवाडी तलावातून, पारनेर तालुक्यातील मुळा नदीच्या शेजारी देसवडे, मांडवा, तास व ढवळपूरी व संगमनेर तालुक्यातील साकूर या भागातून माहे डिसेंबर, २०१६ च्या दरम्यान बेकायदा वाळू उपसा होत असल्याचे निदर्शनास आलेले नाही. तथापि, संगमनेर तालुक्यातील मौजे जांबूत येथे वाळूच्या अवैध वाहतूकीच्या चार वाहनांवर कारवाई करून रु. ३,१९,१८०/- एवढा दंड वसूल केला आहे. तसेच अहमदनगर जिल्ह्यातील भरारी पथकांनी एप्रिल २०१६ ते जानेवारी, २०१७ या कालावधीत गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतूकीच्या ७७५ प्रकरणात रु. २,३१,०६,९९१/- एवढा दंड वसूल करून शासनजमा करण्यात आलेला आहे. तसेच ६७ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

नाशिक जिल्हयातील भरारी पथकांनी माहे एप्रिल, २०१६ ते जानेवारी, २०१७ या कालावधीत केलेल्या तपासणीत गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतूकीच्या ७३१ प्रकरणात रु. ४,३६,६२,०००/- एवढा दंड वसूल करून शासनजमा करण्यात आलेला आहे. तसेच १९ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. नाशिक शहरातील गोदावरी नदीच्या पात्रातून वाळू उपसा होत असल्याने नव्याने बांधण्यात आलेल्या घाटांचे नुकसान झाल्याचे निदर्शनास आले नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पनवेल-सायन महामार्गावरील सिमेंट कॉंक्रीटीकरण व भुयारी मार्गांचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(३) * ७५०६६ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल-सायन महामार्गावरील २३ कि.मी. सिमेंट कॉंक्रीटीकरण करण्याच्या कामातील बहुतांश काम प्रलंबित असताना टोल वसुलीची परवानगी देण्यात आली असून टोल सुरू होवून २ वर्षानंतरही कामोठे वसाहतीलगत बांधण्यात आलेले

पाच भुयारी मार्ग प्रवाशांसाठी सुरू करण्यात आले नसल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त महामार्गावरील पर्यायी मार्गाचे व पाच भुयारी मार्गाचे काम अर्धवट असल्यामुळे यामध्ये पाणी साचून मोठ्या प्रमाणावर डासांची उपत्ती होऊन परिसरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे, तसेच कामोठे वसाहतीतून मुंबईकडे जाण्यासाठी नागरिकांना मोठा वळसा घालावा लागत असल्यामुळे त्यांना आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नागरिकांना महामार्ग ओलांडण्यासाठी पर्याय उपलब्ध नसल्याने महामार्ग ओलांडताना कळंबोली व कामोठे परिसरातील नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशीकरुन भुयारी मार्ग व पर्यायी रस्ता सुरु करण्याबाबत तसेच याकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) होय,

एकूण १३ भुयारी मार्गाचे काम अपूर्ण असून ते पूर्ण करण्याबाबत उद्योजकास आदेशित करण्यात आले आहे. वन विभागाकडून ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त झालेनंतर उर्वरित काम उद्योजकाने न केल्यास त्याच्या खर्चाने व जबाबदारीवर विभागामार्फत पूर्ण करण्यात येईल.

कामोठे येथे मुंबई दिशेकडे जाणा-या सेवा रस्त्याचे काम पूर्ण करण्यासाठी वनजमीन वळती करण्याचा प्रस्ताव वन विभागास सादर केला असून मंजूरी प्राप्त होताच सदरचे काम करण्यात येईल.

(३) नागरिकांना महामार्ग ओलांडण्यासाठी कळंबोली येथे पादचारी पूल उपलब्ध आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही

-----------------

**मोर्शी (जि.अमरावती) तालुक्यात मुरुम व रेतीचे**
**होत असलेले अवैध उत्खनन**

**(४) * ७९१४७ प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजुरवाडी (ता.मोर्शी,जि.अमरावती) येथील सर्वे क्र. ६५ मधील शासकीय जमिनीवर ठेकेदाराने मुरुमाचे अवैधरीत्या उत्खनन करून शासनाचा महसूल बुडविला असल्याचे दिनांक १६ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच वर्धा नदी पात्रातील अंतोरा, चिंचोली (जि.वर्धा) व निभार्णी (जि.अमरावती) येथील रेती घाटामधून पोकलेन मशिनच्या सहाय्याने अवैधरित्या रेती उपसा होत असल्याचेही दिनांक १६ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार रेती व मुरुमाचे अवैध उत्खनन करून शासनाचा महसूल बुडविणाऱ्यांविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३) व (४) मौजे राजुरवाडी, ता. मोर्शी येथील सर्वे नंबर ६५ मधून ४४ ब्रास मुरुम अवैधरित्या उत्खनन केल्याचे निदर्शनास आल्यानुसार संबंधितास दंडात्मक कारवाईची नोटीस बजावून त्यांचे म्हणणे मागविण्यात आले आहे.

वर्धा जिल्ह्यातील मौजे अंतोरा व चिंचोली येथील रेतीघाटातून आणि अमरावती जिल्ह्यातील निभार्णी येथील रेतीघाटातून पोकलेन मशिनद्वारे अवैध रेती उपसा होत असल्याचे निदर्शनास आले नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

**मौजे हरिपुर (ता.मिरज, जि.सांगली) या गावाच्या हद्दीत**
**अवैध वाळू उपसा होत असल्याबाबत**

**(५) * ७९१७७ श्री.धनंजय (सुधीर) गाडगीळ (सांगली) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयातील ठेकेदार मौजे हरिपुर (ता.मिरज, जि.सांगली) या गावाच्या हद्दीतील वाळू अवैधरीत्या विना निविदा प्रक्रिया उपसा करीत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिरोळ (जि.कोल्हापूर) तालुक्यातील कोथळी व दानोळी या गावामधील वाळू उपशाचे ठेके देण्यात आले असताना सदरहू ठेकेदारांनी सांगली जिल्हयाच्या हद्दीतील वाळू उपसा केला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, मौजे हरीपूर व अंकली येथे मोठया प्रमाणात करण्यात आलेल्या वाळू उपशामुळे त्या भागातील शेती खचून मोठया प्रमाणात नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने अवैध वाळू उपसा करणाऱ्या ठेकेदारांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची काय कारणे आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) अशा बाबी निदर्शनास आल्या नाहीत.

(४) कोल्हापूर जिल्ह्यातील शिरोळ तालुक्यातील मौजे कोथळी येथील २ वाळूगट लिलावात गेले असून, संबंधित लिलावधारकांना वाळूगटाचे ताबे देण्यात आले असून, त्यांच्यामार्फत मंजूर वाळूगटातून उत्खनन करण्यात येत आहे.

(५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**खेड, दापोली, मंडणगड व चिपळूण (जि.रत्नागिरी) या चार तालुक्यांना**
**जोडणाऱ्या वाशिष्ठी खाडीवरील पूल बांधण्याबाबत**

**(६) * ७३८३६ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेड, दापोली, मंडणगड व चिपळूण (जि.रत्नागिरी) या चार तालुक्यांना भौगोलिकदृष्ट्या जोडणाऱ्या वाशिष्ठी खाडीवर मौजे करंबवणे ते बहिरवली दरम्यान पूल बांधण्याची नितांत आवश्यकता असल्याने सदर पुलासाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी सातत्याने निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पूल बांधल्यामुळे उक्त मार्ग या चारही तालुक्यातील प्रवासी तसेच पर्यटकांना सोयीचा व आर्थिक बचतीचा ठरणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने उक्त पुलाच्या बांधकामासाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) होय.

(३), (४) व (५) विषयांकित पुलाचे बांधकाम करण्याचे काम निकष, मंजुरी व निधीच्या उपलब्धतेच्या अधीन राहून हाती घेण्याचे नियोजन आहे.

-----------------

**नाशिक-पुणे महामार्गावरील सर्व्हिस रोडचे काम पूर्ण करण्याबाबत**

**(७) * ७८६३९ श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक-पुणे महामार्गावरील गोंदे फाटा (ता. सिन्नर) येथील उड्डाणपुलाचे काम पूर्ण होऊन एक वर्षापेक्षा जास्त कालावधी होऊन देखील सर्व्हिस रोडचे काम अद्यापपावेतो पूर्ण झाले नसल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सर्व्हिस रोडचे काम अपूर्ण असल्यामुळे उक्त ठिकाणी वारंवार अपघात होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर अपघातांना आळा घालण्यासाठी सर्व्हिस रोडचे काम तातडीने पूर्ण करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी पत्राद्वारे कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडे दिनांक ६ जानेवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

गोंदे येथील ४ बाजूच्या सर्व्हिस रोडपैकी फक्त एकाच बाजूच्या सर्व्हिस रोडचे काम एका गट क्रमांकाच्या तपशीलाअभावी भूसंपादन प्रलंबित असल्याने अपूर्णावस्थेत आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे आहे.

(४) केंद्र शासनाच्या रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाने दिनांक ३०/०१/२०१७ रोजी त्या गटाच्या भूसंपादनासाठी राष्ट्रीय महामार्ग अधिनियमाच्या कलम ३ D ची अधिसूचना प्रसिध्द केली असल्याने प्रलंबित जोडरस्त्याचे काम प्राधान्याने पूर्ण करण्यात येणार असल्याचे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, नाशिक यांनी कळविले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ठाणे व पालघर जिल्हयातील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी केलेला गैरव्यवहार

**(८) * ७४२१८ श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मे. जिजाऊ कंस्ट्रक्शन् कंपनीने पालघर जिल्हयातील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांशी व ठाणे येथील अधिक्षक अभियंता यांच्याशी संगनमत करुन ७० कोटी रुपयांची देयके काढून गैरव्यवहार केला असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोने-अघई (ता.वाडा, जि.पालघर) या राजमार्गाच्या साडे आठ कि.मी.च्या टप्प्यासाठी तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाने तयार केलेल्या रुपये ९ कोटी, ७९ लाख रुपयांच्या अंदाजपत्रकाच्या २५ टक्के अधिक दराने

मे. जिजाऊ कन्स्ट्रक्शन या कंपनीला काम दिल्याने शासनाचे रुपये ४ कोटी, ७८ लाखांचे नुकसान झाल्याचे दिनांक १३ डिसेंबर, २०१६ रोजी निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कुडुस-कंचाड, सापरोंडे-उचाट, कुडुस-कोंडले या रस्त्यांचे अंदाजपत्रकही जास्त रकमेचे करुन निकृष्ट दर्जाची कामे केल्यामुळे उक्त चारही प्रकरणी एसआयटी मार्फत चौकशी करण्यात यावी अशी लेखी मागणी श्रमजीवी संघटनेचे संस्थापक यांनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर गैरव्यवहार प्रकरणी जिल्हाधिकारी यांनी विशेष पथकामार्फत (एसआयटी) तपासणी करुन दोषींवर फौजदारी कारवाई करण्याबाबतचा अहवाल शासनास सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर अहवालाच्या अनुषंगाने सदर कंपनीच्या मालकासह संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३) व (४) शासनाकडे तक्रार प्राप्त झाली आहे. तक्रारीतील बाबींची तपासणी करण्यासाठी मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, मुंबई यांना दि. १५/२/२०१७ रोजी सुचना दिल्या आहेत.

(५) व (६) चौकशी प्रगतीत आहे.

-----------------

## नांदेड ते भोकर फाटा (जि.नांदेड) या मार्गासाठी पर्यायी वाहतूक व्यवस्था करण्याबाबत

**(९) * ७६२२३ श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर-नागपूर, नांदेड-अकोला व कल्याण-निर्मल या वेगवेगळया महामार्गांना जोडणारा नांदेड ते भोकर फाटा हा दहा किलोमीटरचा मार्ग असून या तिन्ही मार्गावरील सर्वात जास्त वाहतूक याच १० कि.मी. मार्गावरून होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मार्गावर आसना नदीवर एकच पूल असल्याने उक्त ठिकाणी वारंवार वाहतूक ठप्प होत असते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नववर्षाच्या सुरुवातीलाच सदर मार्गावर जड वाहनाच्या भीषण अपघातात चार जण मृत्युमूखी पडल्याचे दिनांक २ जानेवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अर्धापूर-नांदेड रस्त्यावरील आसना नदीवर नव्याने बांधण्यात आलेला पूल हा गैरसोयीचा असल्याने पर्यायी वाहतूक व्यवस्था करण्यात यावी अशी मागणी नागरिक व वाहनचालक करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन पर्यायी मार्ग बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२) हे खरे नाही.

तथापि पूलाच्या एका बाजूचा राष्ट्रीय महामार्ग दुपदरी असल्याने वर्दळीच्या वेळी वाहतूक धीम्या गतीने होते.

(३) हे खरे आहे.

(४) सदर प्रकरणी पदाधिका-यांनी तोंडी मागणी केलेली आहे.

(५) भारतीय राजमार्ग प्राधिकरण (NHAI) मार्फत राष्ट्रीय महामार्ग क्र.३६१ या रस्त्याचे, नवीन पुलासह चौपदरीकरण करण्याचा सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करण्याचे काम प्रगतीत आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## यशवंतराव चव्हाण द्रुतगती महामार्गावरील टोल वसुली बंद करण्याबाबत

**(१०) * ७७३५० श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.दिपक चव्हाण (फलटण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यशवंतराव चव्हाण द्रुतगती महामार्गावरील आयआरबी कंपनीला टोल वसुली करण्याचा दिलेला अधिकार तातडीने काढून घेऊन सदर महामार्गाची सन २०१९ पर्यंतची दुरुस्ती व देखभाल या कंपनी व ठेकेदाराकडून करुन घेण्याबाबतची मागणी सजग नागरी मंचचे अध्यक्ष श्री.विवेक वेलणकर व टोल विषयाचे अभ्यासक श्री. संजय शिरोडकर यांनी माहिती अधिकारातून मिळालेल्या माहितीची सर्व कागदपत्रे जोडून मा.मुख्यमंत्री यांना पत्राद्वारे केल्याचे दिनांक २६ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आयआरबी कंपनीला सन २०१९ पर्यंत २८६७ कोटी रुपये मिळणे अपेक्षीत असताना दिनांक ८ नोव्हेंबर, २०१६ पर्यंत २८७६ कोटी रुपये मिळाले असल्याने सदर कंपनीला टोल वसुलीचा कोणताही अधिकार करारानुसार उपलब्ध होत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार यशवंतराव चव्हाण द्रुतगती मार्गावरील टोलवसुली तातडीने बंद करण्याबाबत व सदर कंपनीकडून महामार्गाची सन २०१९ पर्यंत देखभाल व दुरुस्ती करून घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय.

(२) सन २००४ मध्ये याबाबत झालेल्या करारनाम्यात ९१८ कोटी रुपये आगाऊ किंमत दिल्यावर दिनांक ८ ऑगस्ट २०१९ पर्यंत पथकराद्वारे मिळणाऱ्या कमी अथवा जादा पथकर उत्पन्नाचे अधिकार हे कंत्राटदाराचे राहतील असे नमुद केले आहे.

(३), (४) व (५) सदरहू ठिकाणी करारनाम्यानुसार पथकर वसूली सुरु आहे. तथापि या विषयाच्या अनुषंगाने या पुर्वी मुंबई शहराच्या प्रवेशद्वारावरील पाच पथकर नाके व मुंबई पुणे मार्गावरील पथकर संदर्भात नेमलेल्या अप्पर मुख्य सचिव (सा.बां.) यांचे अध्यक्षतेखालील समितीचा अहवाल शासनास दि. २७.०४.२०१६ रोजी सादर झाला असून सदर अहवाल शासनाच्या विचाराधीन आहे.

-----------------

## सावनेर (जि.नागपूर) तालुक्यामधील दुधाळ जनावरे उपचाराविना दगावत असल्याबाबत

**(११) * ७८५१५ श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावनेर (जि. नागपूर) येथील तालुका लघु पशुवैद्यकीय चिकीत्सालयात उपचार व शस्त्रक्रियेकरीता येणाऱ्या दुधाळ जनावरांची संख्या सर्वाधिक आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या लघु पशुवैद्यकीय चिकीत्सालयात उपायुक्त दर्जाचा एक अधिकारी, वर्ग दोन श्रेणीचे दोन पशुधन विकास अधिकारी व अन्य कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे परंतु कार्यरत डॉक्टर व कर्मचारी मुख्यालयी राहत नसल्याने तसेच ते कार्यालयात वेळेवर हजर राहत नसल्यामुळे दुधाळ जनावरे उपचाराविना दगावत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, लघु पशुवैद्यकीय चिकीत्सालयामधील दुधाळ जनावरांचा उपचार व शस्त्रक्रियेकडे दुर्लक्ष करणाऱ्या डॉक्टर कर्मचाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर :** (१) होय, हे खरे आहे.

(२) नाही, हे खरे नाही.

तालुका लघु पशुवैद्यकीय सर्वचिकीत्सालय सावनेर येथे सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन, पशुधन विकास अधिकारी, पशुधन पर्यवेक्षक, वरिष्ठ लिपीक आणि परिचर यांची प्रत्येकी एक पद मंजूर आहे.

मंजूर पदांपैकी पशुधन पर्यवेक्षक हे पद रिक्त असून इतर सर्व पदे भरलेली आहेत. कार्यरत अधिकारी व कर्मचारी सावनेर येथे मुख्यालयी राहतात व कार्यालयीन वेळेत उपस्थित राहून कार्यक्षेत्रातील जनावरांना पशुवैद्यकिय सेवा देत आहेत. तसेच, उपचाराविना दुधाळ जनावरे दगावत असल्याबाबतची बाब माहे जानेवरी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आलेली नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## हवेली (जि.पुणे) येथील बावधन रामनदी पात्रात अवैध उत्खनन होत असल्याबाबत

**(१२) * ७४१५२ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हवेली (जि.पुणे) येथील बावधन रामनदी पात्रात व पात्रालगत सन २०१० ते २०१६ या कालावधीत उत्खनन करण्याची उपविभागीय अधिकारी कार्यालय, हवेली यांची परवानगी नसतांना बांधकाम व्यावसायिकांनी सदर नदी पात्रात व पात्रालगत उत्खनन केल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बांधकाम व्यावसायिंकाकडून नदीच्या दोन्ही बाजूस बांध टाकून नदीचा प्रवाह अडवण्यात आला असल्याने नदीचे ओढ्यात रुपांतर झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे शासनाला उत्खनना पोटी मिळणाऱ्या महसुलाचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करून संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) अशा बाबी निदर्शनास आलेल्या नाहीत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) रामनदीपात्रातील अतिक्रमणाबाबत मा. राष्ट्रीय हरीत न्यायाधिकरण येथे अर्ज क्रमांक ३९/२०१५ दाखल करण्यात आला आहे. महसूल विभाग, पाटबंधारे विभाग, भूमिअभिलेख विभाग व पुणे महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी सदर नदीपात्रातील अतिक्रमणाची संयुक्त पाहणी केली असून, दिनांक ३०/०९/२०१५ रोजी सदर अतिक्रमण हटविण्यात आले आहे. मा. राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाने उक्त अर्जामध्ये जलसंपदा विभाग व सर्व संबंधित खात्यास पूरनियंत्रण रेषेचे नकाशे निश्चित करण्याचे आदेश दिले असून, त्यानुसार संबंधित विभागाकडून कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**जातेगांव ते टेंभूर्णी (ता.करमाळा, जि.सोलापूर) या रस्त्याच्या बांधकामाबाबत**

**(१३) * ७९५१८ श्री.नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जातेगांव ते टेंभूर्णी (ता.करमाळा, जि.सोलापूर) या रस्त्याचे बांधकाम बी.ओ.टी. तत्वावर मे.सुप्रीम इन्फ्रास्ट्रक्चर या खासगी कंपनीला दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याचे बांधकाम संथगतीने सुरु असून कंपनीस दिलेला अवधी पूर्ण होऊनही अद्याप रस्त्याचे काम पूर्ण झालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने सदर कंपनीस पुन्हा रस्त्याच्या कामासाठी वाढीव मुदत दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, दिलेल्या मुदतीत काम पूर्ण न करणाऱ्या सदर कंपनीवर कारवाई करण्याबाबत व सदर रस्त्याचे काम पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय

(२) होय

(३) सदर उद्योजकास वाढीव मुदत देण्यात आलेली नाही.

(४) दिलेल्या मुदतीत काम पूर्ण न केल्याने उद्योजकास दि.२७.१२.२०१६ च्या पत्रान्वये Preliminary Termination Notice देण्यात आलेली आहे. व त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे. केंद्र शासनाच्या दि.०३.०१.२०१७ च्या राजपत्रानुसार सदरहू रस्ता हा राष्ट्रीय महामार्ग म्हणून घोषित करण्यात आलेला आहे. सदरहू रस्त्याची सुधारणा करणेबाबतची कार्यवाही (DPR इ.) महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांचेकडून करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुरबाड (जि.ठाणे) तालुक्यातील अभयारण्यात व नदीपात्रात डबर व खडीचा अवैधरित्या उपसा होत असल्याबाबत

**(१४) * ७६६२१ श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.चरण वाघमारे (तुमसर), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.नितेश राणे (कणकवली), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुरबाड (जि.ठाणे) तालुक्यातील भीमाशंकर, कळसुबाई व हरिश्चंद्रगड या तीन अभयारण्याच्या हद्दीत व मुरबाडी, काळू, डोईफोडी व कणकवीरा या नद्यांच्या गावालगतच्या पात्रामध्ये मोठ्या प्रमाणात ब्लास्टिंग करून रस्त्याच्या कामासाठी लागणारे डबर व खडी यांचा बांधकाम व्यावसायिक अवैधरित्या वापर करत असल्याचे दिनांक २ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बारवी नदीच्या पात्रातील सासणे गावाच्या हद्दीत तसेच महसूल विभागाच्या सरळगाव, धसई, म्हसा, शिवाळे, टोकावडे, न्याहाडी, मुरबाड या मंडळाच्या हद्दीत डबर व खडीचा उपसा करणाऱ्या ५० च्या जवळपास बेकायदेशीरपणे खदाणी असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर खदाणीमध्ये रोज ब्लास्ट होत असल्यामुळे वन्य प्राण्यांना व जवळपासच्या वाड्या वस्त्यांना धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरप्रकरणी चौकशी करून बेकायदेशीर खदाण मालकांवर तसेच डबर व खडीचा अवैध उपसा करणाऱ्या व्यावसायिकांविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अशी बाब निदर्शनास आली नाही.

(२) प्रश्नात नमूद ठिकाणी बेकायदेशीर खदाणी असल्याचे निदर्शनास आले नाही. तथापि, मुरबाड तालुक्यातील सरळागांव मंडळाच्या हद्दीत मौजे माल्हेड येथे जिल्हाधिकारी ठाणे यांच्याकडून रितसर खाणपट्टा मंजूर करण्यात आला आहे.

तसेच सासणे गावाच्या हद्दीत अवैध वाहतूक झाल्याचे निदर्शनास आल्यानुसार संबंधितांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(३) व (४) संबंधित खाणपट्टाधारकाने खाणपट्यातील उत्खननासाठी स्फोटक वापराचा परवाना संबंधित प्राधिकाऱ्याकडून घेतला आहे. सदर खाणपट्यातील ब्लास्टिंगमुळे जवळपासच्या वाड्या वस्त्यांना धोका निर्माण झाल्याचे निदर्शनास आले नाही. तसेच सदर खाणपट्टा भिमाशंकर अभयारण्यापासून ३० किलोमिटर अंतरावर आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## धुळे, नंदुरबार, जळगांव, औरंगाबाद व अहमदनगर जिल्हयात गुलाबी बोंडअळीचा प्रादुर्भाव होऊन कपाशीच्या उत्पादनात घट झाल्याबाबत

**(१५) * ७५६४० श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील धुळे, नंदुरबार, जळगांव, औरंगाबाद जिल्हात व श्रीरामपूर (जि.अहमदनगर) तालुक्यात जनुकबदल कपाशीची (बीटी) प्रतिकार क्षमता कमी झाल्याने यावर्षी गुलाबी बोंड अळीचा प्रादुर्भाव होऊन कपाशीच्या उत्पादनात मोठया प्रमाणावर घट झाल्याचे माहे डिसेंबर, २०१६ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनामार्फत पाहणी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, पाहणीच्या अनुषंगाने याप्रकरणी नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) धुळे, नंदुरबार, जळगांव, औरंगाबाद जिल्हयात बी.टी.कापसाच्या विविध वाणांवर गुलाबी बोंड अळीचा प्रादुर्भाव झाल्याने नुकसान झाल्याचे आढळून आलेले आहे. अहमदनगर जिल्हयातील श्रीरामपूर तालुक्यात बोंड अळीचा प्रादुर्भाव झाल्याचे आढळून आलेले नाही.

(२) होय.

सदर पाहणीमध्ये जळगाव जिल्ह्यात अंकुर, नुजीविडू, ग्रीन गोल्ड, कीर्तिमान, इ. कंपनीच्या संकरीत वाणांच्या BG II कापूस पिकावर गुलाबी बोंड अळीचा प्रादुर्भाव आढळून आलेला आहे.

तर औरंगाबाद जिल्ह्यात नुजीविडू, राशी, बायर, झायालाम, महिको या कंपनीच्या संकरीत वाणांच्या BG II कापूस पिकावर गुलाबी बोंड अळीचा प्रादुर्भाव आढळून आलेला आहे. इतर जिल्ह्यांत या संदर्भात तक्रारी प्राप्त नाहीत. कीड व रोग सर्वेक्षण प्रकल्पांतर्गत (क्रॉप सॅप) शेतकऱ्यांना आवश्यक ते मार्गदर्शन करण्यात आलेले आहे.

(३) महाराष्ट्र कापूस बी बियाणे (पुरवठा, वितरण, विक्री व विक्रीच्या किमतीचे निश्चितीकरण यांचे विनियमन) अधिनियम २००९ व नियम २०१० अंतर्गत प्राप्त तक्रारींची सुनावणी घेण्याबाबत कार्यवाही सुरू आहे. यामध्ये कंपनीच्या बियाणांमध्ये दोष आढळून आल्यास कायद्यानुसार नुकसान भरपाई देण्यासंदर्भात आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुंबई-गोवा महामार्गाचे चौपदरीकरणाचे काम पूर्ण करण्याबाबत**

**(१६) * ७६१२० श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.संजय पोतनीस (कलिना), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.भरतशेठ गोगावले (महाड), श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.धैर्यशील पाटील (पेण), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्र.६६ च्या चौपदरीकरणासाठी केंद सरकारकडून मंजूरी मिळून सदर प्रकल्पासाठी ३ हजार ८०० कोटी रुपयांच्या खर्चाची तरतूद केंद सरकारकडून करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर महामार्गाच्या पळस्पे ते इंदापूर या पहिल्या टप्प्यातील ८४ कि.मी. च्या कामाला २०११ मध्ये मंजूरी देण्यात आली असून सदर काम माहे एप्रिल, २०१४ अखेर पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित असताना २०१६ वर्ष संपले तरीही

या महामार्गाचे ५० टक्केही काम पूर्ण झालेले नसून पहिल्या टप्प्यातील काम पूर्ण झाल्यानंतर दुसऱ्या टप्प्यातील काम सुरु करण्यात येणार होते परंतु दुसऱ्या टप्प्यातील कामही अद्याप सुरु झाले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील इंदापूर ते पनवेल मार्गाचे गत ६ वर्षांपासून अर्धवट स्थितीत रखडलेले चौपदरीकरणाचे काम माहे डिसेंबर, २०१६ पर्यंत पूर्ण करण्यात येईल, असे आश्वासन मा. मुख्यमंत्री यांनी दिनांक ११ एप्रिल, २०१६ रोजी दिले असून तब्बल ९ महिने उलटूनही हे काम जैसे थे अवस्थेतच आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मुंबई-गोवा महामार्ग आंतरराष्ट्रीय दर्जाचा करतानाच सदर महामार्गावर अपघातातील जखमींना तातडीची वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी हॅलीपॅड उभारण्याचा व जवळपास १३०० सुविधा देण्यात येणार असल्याचा प्रस्तावही शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, मुंबई-गोवा महामार्गाचे चौपदरीकरणाचे काम पूर्ण करण्याबाबत, सदर कामात दिरंगाई करणाऱ्या संबंधित ठेकेदाराविरूध्द कारवाई करण्याबाबत, महामार्गावर हॅलीपॅड उभारण्याबाबत व जवळपास १३०० सुविधा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील** : (१) मुंबई-गोवा ह्या ४७५.२१ कि.मी. राष्ट्रीय महामार्ग क्र.६६ पैकी पनवेल ते इंदापूर ह्या ८४ कि.मी. महामार्गाच्या चौपदरीकरणाचा प्रकल्प भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाकडून खाजगीकरणामधून प्रगतीत आहे.

सन २०१६-१७ मध्ये त्यापुढील इंदापूर ते झाराप ह्या ३६६.१७ कि.मी.च्या महामार्गापैकी ३१८.०७ कि.मी. महामार्गाच्या चौपदरीकरणासाठी केंद्र शासनाकडून रुपये ९५०१.१८ कोटीच्या कामांना मंजूरी प्राप्त झालेली आहे. उर्वरित ४८.१ कि.मी. लांबीच्या कामाचा मंजूरी प्रस्ताव केंद्र शासनाकडे सादर करण्यात आला आहे. सदरची कामे हायब्रीड ॲन्युइटी पध्दतीने करण्यात येणार असून केंद्र शासनाने मंजूर रकमेच्या ४० % (रु. ३ हजार ८०० कोटी) तरतूद केली आहे.

(२) भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण (NHAI) यांच्याकडून प्रगतीत असलेले पळस्पे (०/००) ते इंदापूर (८४/००) पहिल्या टप्प्याचे बांधकाम अजूनही अपूर्ण आहे हे खरे आहे.

इंदापूर ते झाराप हया ३६६.१७ कि.मी.दुस-या टप्प्याच्या चौपदरीकरणाचे काम १० पॅकेजमध्ये हाती घेण्यात आले असून त्यापैकी २५४.०७ कि.मी.महामार्गाच्या ६ पॅकेजसाठी कंत्राटदार नियुक्त करण्यात आले असून ६४.०० कि.मी. महामार्गाच्या दोन भागांसाठी निविदा प्रक्रिया प्रगतीत आहे.

(३) हे काम केंद्रशासनाच्या अखत्यारित असलेल्या भारतीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत केले जात असून सवलतकाराने चौपदरीकरणाचे काम वेगाने करण्याच्या दृष्टीने अतिरिक्त मशिनरी व मनुष्यबळ लावण्यात आले आहे. त्यानुसार पहिल्या टप्प्यातील काम मार्च २०१८ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन असल्याचे प्रकल्प संचालक, पनवेल यांनी कळविले आहे.

(४) हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर ॲम्बुलन्स, प्रथमोपचार सुविधा, प्रसाधन गृहे, वाहनांसाठी पार्कींग इ. सुविधा उपलब्ध होणार आहेत.

(५) पनवेल ते इंदापूर हया ८४ कि.मी.राष्ट्रीय महामार्गाच्या रेंगाळलेल्या कामांसंबंधी संपूर्ण निर्णय प्रक्रिया व कार्यान्वयन हया बाबी केंद्रशासनाच्या अखत्यारीत आहे.

(६) पनवेल ते इंदापूर हया ८४ कि.मी. राष्ट्रीय महामार्गाच्या चौपदरीकरणास पनवेल कर्नाळा पक्षी अभयारण्यामध्ये असलेल्या २० कि.मी. लांबीसाठी पर्यावरण व वन विभागाची मंजूरीस विलंब, मौजे काराव, नागोठाणे व कोलेटी येथील भूसंपादनास विलंब आणि उदयोजकाच्या आर्थिक अडचणी या बाबींमुळे प्रकल्पाचे काम रेंगाळले असल्याचे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, पनवेल यांनी कळविले आहे.

-----------------

## डोंगरकडा (ता.कळमनुरी, जि.हिंगोली) येथे कंद अळीच्या प्रादुर्भावामुळे केळीच्या पिकांचे झालेले नुकसान

**(१७) * ७७१०३ डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोंगरकडा (ता.कळमनुरी, जि.हिंगोली) या गावात व परिसरात केळीच्या पिकांवर मोठया प्रमाणात कंद अळीचा प्रादुर्भाव झाल्याने केळी पिकांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने पाहणी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार केळी पिकांवर होत असलेला कंद अळीचा प्रादुर्भाव रोखण्याबाबत व नुकसानग्रस्त केळी बागायतदारांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१), (२), (३) व (४) अंशत: खरे आहे.

डोंगरकडा (ता.कळमनुरी, जि.हिंगोली) व परिसरात अल्प प्रमाणात केळी पिकावर कंद अळीचा प्रादुर्भाव दिसून आला आहे. डोंगरकडा गावांस कृषि विभागातील अधिकारी, कृषि विज्ञान केंद्र, तोंडापूर व मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी येथील शास्त्रज्ञ यांनी भेट दिली असून, कंदअळीच्या नियंत्रणासाठी शेतकऱ्यांना मार्गदर्शन व प्रचार प्रसिद्धी करण्यात आली आहे.

-----------------

**अलिबाग, मुरूड व रोहा (जि.रायगड) तालुक्यातील**
**पूल व साकव नादुरुस्त असल्याबाबत**

**(१८) * ७६५११ श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.अजित पवार (बारामती), श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रायगड जिल्हयातील अलिबाग, मुरूड व रोहा तालुक्यातील अनेक रस्ते, पूल व साकव माहे जुलै, २०१६ ते सप्टेंबर, २०१६ या कालावधीत झालेल्या अतिवृष्टीमुळे नादुरुस्त होऊन काही प्रमाणात खचले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तळा (जि.रायगड) तालुक्यातील तळा - रोहा या राज्यमार्गावरील पढवण नदीवरील पूलाची एक बाजू ढासळली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर पूल व साकव वाहतुकीस योग्य नसल्यामुळे प्रवाशांनाही त्रासदायक ठरत आहे तसेच सदर पूल व साकव पूर्णपणे पडल्यास अनेक गावांचे संपर्क तुटण्याची तसेच मनुष्य व वित्तहानी होण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर तालुक्यातील पुलांचे व साकवांचे संबंधित विभागाकडून स्ट्रक्चरल ऑडिट करून नादुरूस्त पूल व साकव यांची दुरूस्ती करण्याबाबत व काही पुलांचे नवीन बांधकाम करण्याबाबत तसेच रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

रायगड जिल्हयातील रोहा तालुक्यामध्ये अतिवृष्टीमुळे अलिबाग रोहा कणघर वावे रामा ९१ वरील कि.मी. ४१/४१० येथील लहान पूल क्षतिग्रस्त झाला आहे.

(२) व (३) अंशत: खरे आहे.

तळा व रोहा तालुक्यातून जाणाऱ्या अलिबाग रोहा कणघर वावे रस्त्याचे साखळी क्र. ६४/२५० मधील सदर पूलाची रिटर्नची एक बाजू खचली असून त्याची तात्पुरती दुरुस्ती करुन पुलावरुन वाहतूक सुरु आहे.

(४) व (५) अलिबाग रोहा रस्त्यावरील किमी ४१/४१० मधील पुलाच्या ठिकाणी तात्पुरत्या वळण रस्त्याचे काम त्वरीत करण्यात आले आहे.

सदर ठिकाणी नवीन पुलाचे पुनर्बांधणीचे काम प्रगतीत आहे.

रोहा तालुक्यातील अलिबाग कणघर वावे या रस्त्यावरील लहान पुलांची प्राथमिक तपासणी करण्यात आली आहे.

-----------------

## कर्जत-कल्याण-मुरबाड या राज्यमार्गाची दुरुस्ती करण्याबाबत

**(१९) * ७७९५१ श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्जत (जि.रायगड) तालुक्यातील कर्जत-कल्याण-मुरबाड या राज्यमार्गावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडल्याने हा मार्ग वाहतुकीसाठी अत्यंत धोकादायक झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मार्गावरून अवजड वाहनांची सतत वाहतूक होत असून विद्यार्थी, कामगार व नागरिकांना सदर मार्गावरून नियमित जाणे येणे करावे लागत असल्याने मार्गावरील खड्ड्यांमुळे अपघात होऊन अनेक नागरिकांना प्राण गमवावे लागत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत स्थानिक लोकप्रतिनीधींनी सार्वजनिक बांधकाम विभाग, कर्जत यांना चार महिन्यापूर्वी लेखी निवेदने देऊनही अद्यापपर्यंत कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर मार्गावरील खड्डे बुजविले नाही तर तीव्र आंदोलन करण्याचा निर्णय तेथील जनतेने घेतला आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, चौकशी करून सदर मार्ग दुरुस्त करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

रस्त्याच्या डांबरी पृष्ठभागास काही ठिकाणी पडलेले खड्डे डांबर मिश्रित खडीने भरुन रस्ता वाहतुकीसाठी सुस्थितीत ठेवण्यात आला आहे.
(२), (३) व (४) हे खरे नाही.
(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील दुष्काळग्रस्त गावांतील शेतकऱ्यांना आर्थिक मदत मिळण्याबाबत**

**(२०) * ७४२८९ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील दुष्काळग्रस्त म्हणून मदत देण्यात येणाऱ्या गावांच्या यादीतून वगळण्यात आलेल्या ११ हजार ८६२ गावांना शासनाने दिनांक २३ मार्च, २०१६ रोजी पुन्हा शासकीय अधिसूचना काढून दुष्काळग्रस्त म्हणून घोषित केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त गावांच्या कर्ज वसूलीस स्थगिती देऊन दुष्काळग्रस्तांना आर्थिक मदत, शैक्षणिक सवलती, वीज बिलात ३३.५ टक्के सूट तसेच कोरडवाहू आणि बागायतदार शेतकऱ्यांना मिळणारी मदत माहे डिसेंबर, २०१६ अखेर निधी अभावी देण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीचे निष्कर्ष काय आहेत,

(४) असल्यास, त्यानुसार जबाबदार असणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्याबाबत व दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना मदत मिळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) दि. २३ मार्च, २०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये अमरावती व नागपूर विभागातील खरीप हंगामातील अंतिम पैसेवारी ५० पैशांपेक्षा कमी असलेल्या ११८६२ गावांमध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे.

(२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## खोट्या रॉयल्टी पावत्या छापून शासनाचा कोटयवधी रुपयांचा महसूल बुडविल्याबाबत

**(२१) * ७८२६९ श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पवई (मुंबई) येथील न.भू.क्र. १६ या भूखंडावर बांधण्यात येणाऱ्या इमारतीच्या बांधकामास लागणारी रेती, खडी व इतर माल यांचा पुरवठा मे. ए.के. इन्टरप्रायजेस व मे. एस. जे.इन्टरप्रायजेस या कंपन्या करत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रत्येक कंपनीला कॉरीच्या ठिकाणी रॉयल्टी भरणे बंधनकारक असतांना खडी मशीन मालक व उक्त कंपन्यांनी रॉयल्टी न भरता खोट्या रॉयल्टी पावत्या छापून शासनाचा कोटयवधी रुपयांचा महसूल बुडविला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने उक्त खडी मशीन मालक व कंपन्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) मौजे पवई, ता. कुर्ला येथील न.भू.क्र. १६ पै येथील इमारतीच्या बांधकामास प्रश्नात नमूद कंपन्यांमार्फत खडीचा पुरवठा करण्यात येतो, हे खरे आहे.

(२), (३) व (४) प्रश्नाधीन इमारतीसाठी पुरवठा होणाऱ्या खडीच्या खनिपट्टयाचे ठिकाण ठाणे व रायगड जिल्हयात असल्याने सदर खडीच्या वाहतुकीसाठी वापरण्यात आलेल्या वाहतूक पावत्यांची तपासणी करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी ठाणे व रायगड यांना देण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जव्हार (जि.पालघर) तालुक्यातील सार्वजनिक बांधकाम विभागात झालेला गैरव्यवहार

**(२२) * ७९७११ श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २००२ ते २००७ व सन २००९ ते २०१२ या कार्यकाळात श्री. हेमंत भानुशाली, शाखा अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, जव्हार (जि.पालघर) यांनी मंजूरी दिलेल्या कामांच्या देयकांच्या प्रती व मोजमाप पुस्तिका कार्यालयातून गहाळ करुन करोडो रुपयांचा गैरव्यवहार केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन कारवाई करण्याबाबत लेखी मागणी शिवक्रांती संघटनेने मा. मुख्यमंत्री, जिल्हाधिकारी, पालघर व अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, ठाणे यांच्याकडे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, माहितीच्या अधिकारान्वये श्री. हेमंत भानुशाली, शाखा अभियंता यांच्याबाबत माहिती मागितली असता सदर कार्यालयात त्यांच्याबाबत कोणतीही माहिती उपलब्ध नसल्याचे सार्वजनिक बांधकाम उपविभाग, जव्हार या कार्यालयाने त्यांच्या जा.क्र. सा.बां./उपवि.ज./१२५६/२०१६ दिनांक १७/११/२०१६ या पत्राद्वारे कळविले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार मोजमाप पुस्तिका व कामांच्या देयकांच्या प्रती गहाळ करणाऱ्या शाखा अभियंत्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) विषयाधीन प्रकरणी अध्यक्ष, शिवक्रांती सामाजिक संघटना, वाडा, जि.पालघर यांच्याकडून शासनास तक्रार प्राप्त झाली आहे.
(३) श्री.हेमंत भानुशाली, शाखा अभियंता यांच्या सा.बां.उप विभाग, जव्हार येथील सन २००२ ते दि.३१.०१.२००५ व दि.०५.०६.२००८ ते दि.२२.०७.२०१२ या कर्तव्य कालावधीत त्यांच्या अखत्यारीत असलेल्या कामांच्या देयकांच्या प्रती व मोजमाप पुस्तिका देयके अदा करण्यासाठी जव्हार विभागीय कार्यालयाकडे सादर करण्यात आल्या होत्या. यास्तव, सदर कागदपत्रे उप विभागात उपलब्ध नसल्याने तसे उप अभियंता, सा.बां. उपविभाग, जव्हार यांनी त्यांचे पत्र क्र. सा.बां./उपवि.ज./१२५६/२०१६, दिनांक १७.११.२०१६ अन्वये कळविले आहे.
(४) व (५) प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने मुख्य अभियंता, मुंबई (सा.बां.) प्रादेशिक विभाग, मुंबई यांच्याकडून अहवाल मागविण्यात आला आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कल्याण-डोबिंवली (जि.ठाणे) शहरात अनधिकृत रिक्षा चालकांमुळे वाहतूक कोंडी होत असल्याबाबत

**(२३) * ७४५७९ श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) शहरात २५ ते ३० हजार रिक्षा रस्त्यावर चालविण्यात येत असून हजारो अनधिकृत रिक्षा चालकांनी त्यांच्या सोईसाठी मनमानीपणे रिक्षा थांबे तयार करुन रस्त्याच्या दुतर्फा रिक्षा उभ्या करत असल्याने शहरात मोठ्या प्रमाणात वाहतूककोंडी होत असल्याची तक्रार वारंवार करूनही या रिक्षा चालकांवर कोणतीही कारवाई केली जात नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनधिकृत रिक्षा स्थानकांवर कारवाई करण्यापूर्वी रिक्षांसाठी अधिकृत थांबे तयार करण्याचा प्रस्ताव महापालिकेकडे प्रलंबित असल्याचे स्पष्टीकरण प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून दिले जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अनधिकृत रिक्षा चालकांवर कारवाई करुन अधिकृत रिक्षा थांब्याच्या प्रस्तावास मंजूरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१), (२), व (३) कल्याण-डोंबिवली येथील अधिकृत रिक्षा थांब्याबाबत उप प्रादेशिक परिवहन कार्यालय कल्याण यांच्याव्दारा सर्वेक्षण करण्यात येऊन कल्याण शहरासाठी रिक्षा स्टॅण्डचा प्रस्ताव दि. ०८.०९.२०१५ व डोंबिवली येथील रिक्षा स्टॅण्डचा प्रस्ताव दि.०९.०८.२०१६ रोजी कल्याण - डोंबिवली महानगरपालिकेकडे पाठविण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

### मंचर (ता.आंबेगाव, जि.पुणे) येथील सिंजेटा कंपनीने शेतकऱ्यांना टोमॅटो व फुलकोबी या पिकांचे निकृष्ट दर्जाचे बियाणे व रोपे दिल्याबाबत

**(२४) * ७६८९९ श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निघोटवाडी, मंचर (ता.आंबेगाव, जि.पुणे) येथील सिंजेटा कंपनीने शेतकऱ्यांना टॉमेटो व फ्लॉवर भाजीचे निकृष्ट दर्जाचे बियाणे व रोपे दिल्याची तक्रारी कृषी विभाग (ता.आंबेगाव, जि.पुणे) यांच्याकडे व सिंजेंटा कपंनीकडे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान लेखी स्वरुपात शेतकऱ्यांनी केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २ जानेवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास मा.कृषि मंत्री यांच्याकडे निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास,चौकशीच्या अनुषंगाने सिंजेंटा बियाणे कंपनीवर कारवाई करण्याबाबत तसेच शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) अंशत: खरे आहे.
(२) होय.
(३) होय.
(४) स्नोहार्ट या सिंजेंटा कंपनीच्या फुलकोबी पिकाच्या बियाणाबाबत एका शेतकऱ्याची तक्रार प्राप्त झाली होती. सदर तक्रारीच्या अनुषंगाने तालुका तक्रार निवारण समितीने संबंधित शेतकऱ्याच्या शेतावर जाऊन पिकाची पाहणी केली, सदर समितीने बियाणांमध्ये कोणताही दोष आढळून न आल्याबाबतचा अहवाल दिल्यामुळे सिंजेंटा कंपनीवर कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही. टोमॅटो बियाणांसंदर्भात या हंगामात कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मालवण-देवगड सागरी महामार्गावरील कोळंब (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) या पुलाची दुरुस्ती करण्याबाबत

**(२५) * ७८७१४ श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील महाड जवळील सावित्री नदीवरील पूल दिनांक २ ऑगस्ट, २०१६ रोजी कोसळल्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागाने राज्यातील सर्व पूलांचे सर्वेक्षण केले असता मालवण-देवगड सागरी महामार्गावरील कोळंब पूल अवजड वाहतूकीसाठी धोकादायक असल्याचे उघड झाल्यानंतर मागील

७ महिन्यांच्या कालावधीत सदरहू पूलाच्या पुर्नबांधणी विषयी शासनाने कोणतीही कार्यवाही न करता आता या पुलाचे स्टील अनेक ठिकाणी सडले असून खाडीपात्रातील खांब आणि पूल यांना जोडणाऱ्या भागामध्ये असलेल्या लोखंडी पट्ट्याही कमकुवत झाल्या असल्यामुळे पूल अवजड वाहनांसाठी बंद केल्यामुळे त्या परिसरातून वाहतूक करणाऱ्या ग्रामीण जनतेस तसेच अन्य प्रवाशांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पर्यायी व्यवस्था म्हणून सध्या सुरू असलेल्या कातवड-ओझर मार्गे एसटी बस सेवा वाहतूकीमुळे सर्जेकोट-मीऱ्याबांदा,कांदळगाव, हटी, कोळंब, रेवंडी या गावातून मालवण येथे ये-जा करणाऱ्या जेष्ठ नागरीक, शाळा-कॉलेजचे विद्यार्थ्यांसह प्रवाशांना नाहक आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे तसेच सदरहू पर्यायी वाहतूक मार्ग खड्डयामुळे धोकादायक बनला असून कोणत्याही क्षणी अपघात होऊन मोठी जिवीत व वित्त हानी होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त पुलाची दुरुस्ती करण्याबाबतचा अडीच कोटी रुपयांचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू प्रस्तावास मंजूरी देऊन सदर पुलाची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

पूलाची तांत्रिक सल्लागारांकडून पाहणी केल्यानंतर पूल क्षतिग्रस्त झाल्याचे निष्पन्न झाले. पूलावरुन अवजड वाहनांची वाहतूक दि.१३.१.२०१७ पासून बंद करण्यात आली आहे.

(२) होय.

पर्यायी मार्ग जिल्हा परिषद, रत्नागिरी यांच्या अखत्यारीत आहे. या रस्त्याच्या डांबरी पृष्ठभागावरील खड्डे भरुन रस्ता वाहतूकीस सुस्थितीत ठेवण्यात आला आहे. या रस्त्याच्या काही क्षतिग्रस्त लांबीतील दुरुस्तीचे काम मंजूरी, निधी, निकष व प्राधान्यक्रमानुसार हाती घेण्याचे नियोजन आहे.

(३), (४) व (५) पूलाच्या दुरुस्तीच्या रु.३५० लक्ष रकमेच्या कामास मान्यता प्रदान करण्यात आली आहे. पूलाच्या दुरुस्तीच्या कामाचे सविस्तर अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यता प्रदान करुन कामासाठी ठेकेदारी निश्चित करण्याची कार्यवाही प्रगतीत आहे.

-----------------

**बागलाण (जि.नाशिक) तालुक्यातील शेतकऱ्यांना दुष्काळसदृश्य परिस्थितीचे अनुदान देण्याबाबत**

**(२६) * ७४३८० श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बागलाण (जि.नाशिक) या तालुक्यास सन २०१५-२०१६ यावर्षात शासनाने मान्य केलेले दुष्काळ सदृश्य परिस्थितीबाबतचे अनुदान अद्याप शेतकऱ्यांना मिळाले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दुष्काळाचे अनुदान शेतकऱ्यांना तातडीने देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक १६ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास मा.महसूल मंत्री यांचेकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी शासनाने केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार बागलाण येथील शेतकऱ्यांना दुष्काळसदृश्य परिस्थितीचे अनुदान देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) बागलाण तालुक्यातील एकूण ९८४५१ शेतक-यांना रु.५०.१४ कोटी इतकी मदत वाटप करण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राष्ट्रीय महामार्ग क्र.३ वरील उड्डाणपुलाचे बांधकाम जलदगतीने करण्याबाबत**

**(२७) * ७७४९० श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय महामार्ग क्र.३ या महामार्गावरील अणजुर फाटा व कल्याण फाटा याठिकाणी सुरु असलेले उडडाणपुलाचे बांधकाम अतिशय संथ गतीने सुरु असल्यामुळे मोठया प्रमाणात वाहतुकीची कोंडी होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई अहमदाबाद महामार्गावरील वर्सोवा पूल बंद करण्यात आल्याने सदर महामार्गावरील सर्व वाहतूक राष्ट्रीय महामार्ग क्र.३ वर वळविण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर उड्डाणपुलांचे बांधकाम त्वरित पुर्ण करण्याबाबतची मागणी ॲडव्हान्टेज नाशिक या संस्थेने सार्वजनिक बांधकाम विभागाकडे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने सदर उड्डाणपुलांचे बांधकाम जलदगतीने पूर्ण करून राष्ट्रीय महामार्ग क्र.३ वरील वाहतूक सुरळीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय.

(३) नाही.

(४) राजणोली नाका व माणकोली येथील सेवा वाहिन्यांचे संरक्षण व मजबुती करणाचे काम पुर्ण करण्यात आले आहे. त्यामुळे ३१ मार्च, २०१७ अखेर राजणोली नाका येथील सेवा रस्त्याचे काम पुर्ण करण्याचे व वाहतुक सेवा रस्त्यावर वळविण्याचे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत नियोजित आहे. तसेच माणकोली येथील उड्डाणपूलाचा उजव्याबाजुच्या वाहनमार्गाचे ८०% काम पूर्ण झाले असून या पूलाच्या चार वाहिन्यांचे काम दिनांक ३१ मार्च, २०१७ अखेर पूर्ण करुन वाहतुकीसाठी खुला करण्याचे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत नियोजित आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राष्ट्रीय महामार्ग क्र.२२२ या महामार्गाचे चौपदरीकरण करण्याबाबत**

**(२८) * ७६३४६ श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-नगर या २२२ क्रमांकाच्या राष्ट्रीय महामार्गाच्या चौपदरीकरणाच्या कामासाठी भूसंपादन केले जात असून उक्त भूसंपादनाची कार्यवाही अद्यापही पूर्ण झालेली नसल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त महामार्गाच्या चौपदरीकरणासाठी जमीन देण्यास ग्रामस्थांकडून तीव्र विरोध केला जात असून रास्ता रोको आंदोलन करण्याचा इशाराही ग्रामस्थांनी दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, भूसंपादनाची कार्यवाही जलद गतीने करून उक्त महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम तातडीने पूर्ण करण्याबाबत व ज्या शेतकऱ्यांच्या जमिनीचे भूसंपादन केले त्यांना त्यांच्या जमिनीचा योग्य मोबदला देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) कल्याण - नगर या राष्ट्रीय महामार्ग क्र.२२२ (नवीन ६१) पैकी शहाड ते मुरबाड हया २८ कि.मी. महामार्गाच्या चौपदरीकरणासाठी तसेच मुरबाड ते मढ जि.पुणे हया ६३ कि.मी. महामार्गाच्या पेव्हड शोल्डरसह दुपदरीकरणासाठी भूसंपादनाची कार्यवाही पूर्ण झाली नाही, हे खरे आहे.

तसेच मढ ता.जुन्नर जि.पुणे ते अहमदनगर हया ११० कि.मी. महामार्गाच्या पेव्हड शोल्डरसह दुपदरीकरणासाठी पुणे जिल्हयातील ६ गावांमध्ये ४.३५ हे.भूसंपादनाची कार्यवाही प्रगतीत आहे.

(२) होय, ठाणे जिल्हयामधील कल्याण तालुक्यामधील रायता गावामध्ये भूधारकांचा महामार्गाच्या आखणीस विरोध असल्याने संयुक्त मोजणी होऊ शकली नाही.

(३) हा प्रकल्प केंद्र शासनाच्या रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयामार्फत राबविला जात असून राज्य शासनाचा सार्वजनिक बांधकाम विभाग फक्त

कार्यान्वयन यंत्रणा म्हणून कार्यरत होता. केंद्र शासनाने जुलै, २०१६ मध्ये हया प्रकल्पाचे कार्यान्वयन भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचेकडे सोपविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**महाराष्ट्र कृषी उदयोग विकास महामंडळाकडून निकृष्ट दर्जाच्या वस्तुंचा पुरवठा केल्याबाबत**

**(२९) * ७७७०७ श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महाराष्ट्र कृषी उदयोग विकास महामंडळाकडून देण्यात येणाऱ्या बैलगाडया, इलेक्ट्रीक पंप, डिझेल इंजिन व पाईप या सर्वच वस्तू निकृष्ट दर्जाच्या असल्याच्या अनेक तक्रारी लाभार्थ्यांनी केलेल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पंचायत समिती, नेवासा (जि.अहमदनगर) येथे विशेष घटक योजने अंतर्गत अनुसूचित जाती जमातीच्या लाभार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या बैलगाडया या निकृष्ट दर्जाच्या असल्याने लाभार्थ्यांनी त्या घेण्यास नकार दिल्याची बाब दिनांक ९ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अहमदनगर जिल्हा परिषद व नेवासा पंचायत समितीच्या अधिकाऱ्यांनी बैलगाडयांची पाहणी केल्यानंतर त्या निकृष्ट व हलक्या दर्जाच्या असल्याचे निदर्शनास आल्यानंतर लाभार्थ्यांनी भरलेले पैसे त्यांना परत दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(५) असल्यास, राज्यातील कृषी विभागामार्फत अनुदानावर देण्यात येणाऱ्या वस्तूंऐवजी थेट अनुदान लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) अंशत: खरे आहे.

(२) व (३) बैलगाडया निकृष्ठ दर्जाच्या असल्याने लाभार्थ्यांनी त्या घेण्यास नकार दिलेला नाही.

अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, अहमदनगर यांनी रु.१७,८५०/- एवढ्या दराने बैलगाड्यांचे पुरवठा आदेश दिलेत. विशेष घटक योजनेंतर्गत बैलगाडीसाठी देय अनुदान रु.१५,०००/- एवढे असल्याने उर्वरित लाभार्थी हिश्श्याची रक्कम रु.२,८५०/- १८ लाभार्थ्यांनी भरणा केली. बैलगाड्यांचे वितरणादरम्यान, वाटप करण्यात येत असलेल्या बैलगाडीचे दर स्थानिक पातळीवरील बैलगाडीपेक्षा जास्त असल्याने लाभार्थी हिस्सा जादा असलेल्या गाड्या लाभार्थ्यांनी ताब्यात घेवू नये असे पदाधिकाऱ्यांनी लाभार्थ्यांना सुचविले. त्यामुळे लाभार्थ्यांनी बैलगाड्या ताब्यात घेतलेल्या नाहीत. १८ लाभार्थ्यांकडून घेण्यात आलेले रु.२८५०/- इतक्या लाभार्थी हिश्श्याची रक्कम परत करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) नियोजन विभागाच्या दिनांक ५.१२.२०१६ तसेच कृषी विभागाच्या दिनांक २१.१.२०१७ च्या शासन निर्णयानुसार अनुदानाची रक्कम थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यावर जमा करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

### महाराष्ट्र दूध उत्पादक कृती समितीने दुधाच्या विक्री दरात वाढ केल्याबाबत

**(३०) * ७५२४१ श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), डॉ.तुषार राठोड (मुखेड) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य सहकारी दुग्ध महासंघातील शिखर संस्था असलेल्या महानंदला बैठकीसाठी न बोलवता परस्पर महाराष्ट्र दूध उत्पादक कृती समितीने दूध विक्रीवर २ ते ३ रुपयांची वाढ केल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नोंदणीकृत नसलेल्या संस्थेने दूध दरवाढ करणे अयोग्य असून दूध किंमतीचा भार ग्राहकांवर टाकणे बेकायदा असल्याचे मुंबई ग्राहक पंचायतीने स्पष्ट केले आहे, हे ही खरे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार सदरची बेकायदेशीर दूध दर वाढ करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर :** (१) महाराष्ट्र राज्य सहकारी कृति समितीने राज्यातील खाजगी व सहकारी दूध संघांची दिनांक ८.१.२०१७ रोजी पुणे येथे बैठक आयोजित केली असल्याचे पत्र महासंघास दि.११.१.२०१७ रोजी प्राप्त झाले होते. त्यामुळे सदर बैठकीस महानंदचे प्रतिनिधी अनुपस्थित होते. तथापि बैठकीत दूध विक्री दरामध्ये रु.२ ते ३ इतकी वाढ केल्याची बातमी प्रसारमाध्यमातून प्रसारीत झाल्यामुळे निदर्शनास आली, हे खरे आहे.

(२) व (३) अशाप्रकारची कोणतीही स्पष्टता महासंघास अथवा शासनास प्राप्त झाल्याचे आढळून आलेले नाही. राज्यात खाजगी, सहकार व शासन या तीन क्षेत्राद्वारे दूध हाताळणी केली जाते. शासन केवळ शासकीय दुधाकरीता खरेदी व विक्री दर निश्चित करीत असते.

शासनाचा दूध खरेदी दर सहकारी दूध संघानीही दूध उत्पादकांना द्यावा यासाठी दि.१०.७.२०१५ रोजी महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था अधिनियम १९६१ च्या कलम ७९ अ अन्वये निदेश निर्गमित केले आहेत. सहकारी व खाजगी दूध विक्री दरावर शासनाचे नियंत्रण नाही. त्यामुळे शासनाने यासंदर्भात चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### सेलू (जि. वर्धा) तालुक्यातील रस्ते बांधकामात झालेला गैरव्यवहार

**(३१) * ७४१६२ डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सेलू (जि.वर्धा) तालुक्यातील रस्ता विस्तारीकरण, मजबुतीकरण व डांबरीकरणाच्या कामात सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी निकृष्ट दर्जाचे काम करून २६ कोटी रूपयांचा गैरव्यवहार केल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर वर्धा बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता यांनी कोणतीही कारवाई केलेली नाही आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर गैरव्यवहार प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) अशी बाब निदर्शनास आलेली नसल्यामुळे कारवाई करण्यात आलेली नाही

(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही

----------------

## भोकरदन (जि.जालना) तालुक्यात शेंदरी बोंड अळीच्या प्रादुर्भावामुळे कपाशीच्या पिकांचे झालेले नुकसान

**(३२) * ७८५९८ श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोकरदन (जि.जालना) तालुक्यातील कपाशीच्या पिकांमध्ये शेंदरी बोंड अळीच्या प्रादुर्भावाने २५० एकर कापूस पिकांचे नुकसान झाल्याची बाब माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कृषी विभागाकडे दिनांक ११ जानेवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास १० गावांतील एकूण २३० शेतकऱ्यांनी कापसाचे बियाणे निकृष्ट दर्जाचे असल्याबाबतच्या तक्रारी केल्या आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त तक्रारीनुसार सदरहू नुकसानग्रस्त शेतक-यांच्या पिकांचे पंचनामे शासनाने केले आहेत काय,

(४) असल्यास, त्यानुसार नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) भोकरदन तालुक्यातील कापूस पिकाचे शेंदरी बोंड अळीमुळे सुमारे ३७२ एकर क्षेत्राचे नुकसान झाल्याचे निदर्शनास आलेले आहे.

(२) भोकरदन तालुक्यातील २० गावातील २६० शेतकऱ्यांच्या बी.टी.कापूस बियाणांबाबत तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत.

(३) प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने तक्रार निवारण समितीने पाहणी केली. भोकरदन तालुक्याच्या पाहणीमध्ये राशी, नुजीविडू, मॉन्सॅन्टो, बायर, जे.के.सीड्स, कावेरी, इ. कंपनीच्या कापूस पिकाच्या BG II वाणावर शेंदरी बोंड अळीचा प्रादुर्भाव आढळून आलेला आहे. शेंदरी बोंड अळीच्या नियंत्रण व्यवस्थापनाकरीता क्रॉपसॅप प्रकल्पांतर्गत शेतकऱ्यांना आवश्यक ते मार्गदर्शन करण्यात आलेले आहे.

(४) महाराष्ट्र कापूस बी बियाणे (पुरवठा, वितरण, विक्री व विक्रीच्या किमतीचे निश्चितीकरण यांचे विनियमन) अधिनियम २००९ व नियम २०१० अंतर्गत प्राप्त तक्रारींची सुनावणी घेण्याबाबत कार्यवाही सुरू आहे. यामध्ये कंपनीच्या बियाणांमध्ये दोष आढळून आल्यास कायद्यानुसार नुकसान भरपाई देण्यासंदर्भात आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कागल, शाहूवाडी, राधानगरी (जि.कोल्हापूर) या तालुक्यांमध्ये मुरुम, दगड, मातीचे अवैधरित्या उत्खनन सुरु असल्याबाबत

**(३३) * ७७८६१ डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कागल, शाहूवाडी, राधानगरी (जि.कोल्हापूर) या तालुक्यांमध्ये मुरुम, दगड, माती यांचे विनापरवाना उत्खनन सुरु असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सदरचे अवैध उत्खनन करणाऱ्यांविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) कोल्हापूर जिल्ह्यातील कागल, शाहूवाडी व राधानगरी तालुक्यामध्ये गौण खनिजांच्या अवैध उत्खनन व वाहतुकीच्या काही घटना दृष्टोत्पत्तीस आलेल्या आहेत, ही वस्तुस्थिती आहे. तथापि, कोल्हापूर जिल्हयात गौण खनिजाचे अवैध उत्खनन/वाहतूकीवर निर्बंध घालण्यासाठी तालुकास्तरावर भरारी पथके गठीत करण्यात आली असून, सदर पथकांमार्फत कागल, शाहूवाडी, राधानगरी या तालुक्यांमध्ये माहे जानेवारी, २०१७ मध्ये गौण खनिजाच्या अवैध वाहतूकीच्या १८ प्रकरणांमध्ये संबंधितांविरूध्द दंडात्मक कारवाई करण्यात येऊन रु. ९२,२५०/- एवढा दंड वसूल करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे वडद (ता.औंढा-नागनाथ, जि.हिंगोली) येथील शेतकऱ्यांना अतिवृष्टीचे अनुदान मिळण्याबाबत

**(३४) * ७३९८४ श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे वडद (ता.औंढा-नागनाथ, जि.हिंगोली) येथील शेतकऱ्यांना सन २०१३-१४ मधील अतिवृष्टी अनुदानाचा लाभ मिळण्याकरिता अनुदानाची यादी तलाठी यांनी विलंबाने सादर केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तत्कालीन तहसिलदार, औंढा यांनी अतिवृष्टी अनुदानाचे रुपये ९,३४,०००/- इतक्या रकमेचा धनादेश पी.डी.सी.सी. बँक, औंढा-नागनाथ शाखेत जमा केल्याबाबत दिनांक २० नोव्हेंबर, २०१४ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, खात्यावर जमा झालेले अनुदान घेण्यासाठी शेतकऱ्यांनी बँकेत संपर्क केला असता अशा प्रकारचा कुठलाही धनादेश बँकेत जमा झाला नसल्याबाबत पी.डी.सी.सी. बँक, औंढा-नागनाथ यांनी कळविले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर अतिवृष्टी अनुदान न मिळाल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये फसवणूक झाल्याची भावना व संभ्रमावस्था निर्माण झाल्यामुळे सदर प्रकरणाची चौकशी करुन शेतकऱ्यांना प्रलंबित अतिवृष्टी अनुदान मिळण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनीधींनी दिनांक १८ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे पत्रान्वये केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करुन दोषींवर कारवाई करण्याबाबत व प्रलंबित अतिवृष्टी अनुदान शेतकऱ्यांना मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) तहसिलदार, औंढा-नागनाथ यांनी मौजे वडद या गावातील अतिवृष्टी बाधीत शेतकऱ्यांसाठी अनुदान देण्याकरिता रु.९,३४,०००/- इतक्या रकमेचा धनादेश पी.डी.सी.सी. बँक, औंढा-नागनाथ शाखेत जमा केलेला नाही.

(४) हे खरे आहे.

(५) सदर प्रकरणी उपविभागीय अधिकारी, वसमत यांच्यामार्फत चौकशी करण्यात आली. सदर प्रकरणात उशिराने यादी सादर करणारे तलाठी श्री. ए.व्ही. कोरटकर व श्री. मेहत्रे यांच्यावर संयुक्त विभागीय चौकशी चालू करण्यात आली आहे. प्रलंबित अनुदान वितरीत करण्याची बाब विचाराधीन आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई-नागपूर समृध्दी महामार्गासाठी जमीन देण्यास शेतकऱ्यांचा विरोध असल्याबाबत

**(३५) * ७३८९८ श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड),**

**श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.एकनाथराव खडसे (मुक्ताईनगर), डॉ.अनिल बोंडे (मोर्शी), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-नागपूर या ७१० किलोमीटर लांबी असलेल्या समृध्दी महामार्गासाठी अकरा जिल्ह्यातील शेकडो हेक्टर जमीन संपादित करण्यात येणार असून शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील २७ गावातील तसेच नगर, रहाता व कोपरगाव (जि.अहमदनगर) तालुक्यातील १० गावातील शेतकऱ्यांच्या बागायती जमीनी संपादित करण्यात येणार असल्याने संतप्त झालेल्या बागायतदारांनी व शेतकऱ्यांनी शासनाकडे जमिनींचे संपादन करु नये अशी मागणी माहे जुलै, २०१६ पासून अनेक वेळा केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त महामार्गासाठी कल्याण तालुक्यातील फळेगाव, दानबाव, उशिद, नडगांव, चिंचवली, गुरवली, रुंदे, उतणे, आंबिवली, राये, गुरवली येथील शेतक-यांच्या जमिनीही संपादित करण्यात येणार असल्याने या गावातील ग्रामस्थांच्या संघर्ष समित्यांनी जमीन देण्याबाबत विरोध केल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच वडखा (जि.औरंगाबाद) गावातील शेंद्रा एमआयडीसी जवळील सेझ प्रकल्पासाठी संपादित केलेली जमीन शेतक-यांना परत करण्यात आलेली असताना सदर जमीन मुंबई-नागपूर समृद्धी महामार्गासाठी संपादित करण्याबाबत शासनाने शेतक-यांना दिनांक २५ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास नोटीसी दिलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून शेतकऱ्यांच्या मागण्या मंजूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय.

(२) होय.

(३) नाही.

(४) व (५) महाराष्ट्र महामार्ग (सुधारणा) अधिनियम, २०१६ मधील जमीन एकत्रीकरण योजनेच्या तरतुदीनुसार या महामार्गासाठी जमिनी प्राप्त करण्यात येत आहेत. शासन निर्णय दि. ५ जुलै, २०१६ व दि. ४ जानेवारी, २०१७ प्रमाणे संबंधित भूधारकांना लाभ देय आहेत.

-----------------

**पंढरपूर (जि.सोलापूर) येथील चंद्रभागा नदीच्या पात्रातून अवैधरित्या वाळू उपसा करण्यात येत असल्याबाबत**

**(३६) * ७५८६६ श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर (जि.सोलापूर) येथील चंद्रभागा नदीच्या पात्रातून अहोरात्र वाळूचा बेसुमार उपसा सुरु असून ट्रॅक्टर व गाडयांच्या माध्यमातून अवैध वाळूची वाहतूक केली जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वाळू चोरीकडे स्थानिक महसूल व पोलीस प्रशासन दुर्लक्ष करीत असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर वाळू माफीयांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर तालुक्यात वाळूच्या अवैध उत्खनन व वाहतुकीची काही प्रकरणे दृष्टोत्पत्तीस आली आहेत.

तथापि, पंढरपूर तालुक्यात गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतूक रोखण्यासाठी मंडळ अधिकारी/तलाठी/कोतवाल यांचे पथक तयार करण्यात आले असून, सदर पथकाने माहे एप्रिल, २०१६ ते फेब्रुवारी, २०१७ या कालावधीमध्ये केलेल्या तपासणीत वाळूच्या अवैध वाहतूकीच्या एकूण १३३ प्रकरणांत कारवाई करून रु. १,५६,२५,३३०/- इतकी दंडाची रक्कम वसूल करण्यात आली आहे. तसेच १६ प्रकरणांमध्ये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

वाळूच्या अवैध उत्खनन व वाहतूकीबाबत स्थानिक महसूल व पोलीस प्रशासन दुर्लक्ष करीत असल्याचे निदर्शनास आले नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मोताळा (जि.बुलडाणा) तालुक्यातील नळगंगा प्रकल्पा अंतर्गत कालव्याकरीता गेलेल्या जमिनीच्या नोंदी ७/१२ उताऱ्यावर न केल्याबाबत**

**(३७) * ७९७६३ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोताळा (जि.बुलडाणा) तालुक्यातील नळगंगा प्रकल्पाअंतर्गत कालव्याकरीता गेलेल्या जागेच्या क्षेत्रफळाची नोंद ५० वर्षानंतरही शेतकऱ्यांच्या ७/१२ उतारावर कोट खराब म्हणुन न केल्याने शेतकऱ्यांना त्याचा शेतसारा भरावा लागत असून त्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार शेतकऱ्यांच्या जमीनीचे ७/१२ उतारे दुरूस्त करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३) व (४) स्थानिक दैनिकांमध्ये प्रसिध्द झालेल्या वृत्तांच्या अनुषंगाने उप विभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, मलकापूर यांच्या अध्यक्षतेखाली एकुण ७ सदस्यांची चौकशी समिती जिल्हाधिकारी, बुलढाणा यांनी नियुक्त केली आहे. सदर चौकशी समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर नळगंगा प्रकल्पासाठी संपादित केलेल्या खाजगी जमिनीचे कमी-जास्त पत्रक तयार करण्यात येवून संपादित जमिनीच्या गा.न. नं.७/१२ उता-यामध्ये आवश्यक ती सुधारणा करण्याची कार्यवाही करण्याचे संकल्पित आहे.

-----------------

**भंडारा व गोंदिया जिल्ह्यात निकृष्ट दर्जाच्या धान बियाणांची**
**विक्री करुन शेतकऱ्यांची केलेली फसवणूक**

**(३८) * ७५४४१ श्री.चरण वाघमारे (तुमसर), श्री.विजय रहांगडाले (तिरोडा), श्री.राजेश काशीवार (साकोली) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा व गोंदिया जिल्ह्यात यशोदा सीड्स व रायझिंग सन सीड्स या कंपनीने शेतकऱ्यांना विक्री केलेले धान बियाणे उगविलेच नसल्याने २१ कृषी केंद्रातून ११ लाख रुपयाचे ४०.२० क्विंटल बियाणे कृषी विभागाने जप्त केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने कृषी विभागातील अधिकाऱ्यांनी दिनांक २४ जून, २०१६ रोजी वा त्या सुमारास या निकृष्ट दर्जाच्या बियाण्यांची विक्री करणाऱ्या कंपनीची चौकशी केलेली असतानाही अद्याप कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास,चौकशीच्या अनुषंगाने शासनाने सबंधित कंपनीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) अंशतः खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) तक्रारीच्या अनुषंगाने मे.यशोदा हायब्रीड सीड्स, हिंगणघाट व रायझिंग सन सीड्स, नागपूर यांच्या तक्रार प्राप्त भात बियाणे वाणांवर निलंबनाची कारवाई करण्यात आलेली आहे. तसेच अप्रमाणित बियाणे नमुन्यांसंदर्भात कंपनी विरोधात न्यायालयात दावे दाखल करण्यात आलेले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नाशिक अहमदनगर व जळगांव जिल्ह्यात शेतकऱ्यांच्या**
**आत्महत्याचे प्रमाण वाढत असल्याबाबत**

**(३९) * ७४१३७ श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.संजय सावकारे**

**(भुसावळ), श्री.विजय औटी (पारनेर), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), श्री.हरीभाऊ जावळे (रावेर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हयातील विविध तालुक्यात माहे जानेवारी ते डिसेंबर, २०१५ या कालावधीत ८५ तर माहे जानेवारी ते डिसेंबर, २०१६ या कालावधीत ८४ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची बाब माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आल्याचे तसेच हिंगणदेहरे (ता.नांदगाव, जि.नाशिक) येथील शांताराम तानाजी बच्छाव या शेतकऱ्याने नापिकी व कर्जबाजारीपणाला कंटाळून शेतात गळफास घेवून आत्महत्या केली असल्याचे माहे जानेवारी २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच अहदमनगर जिल्हयात गत वर्षात सुमारे १३६ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याबाबतची माहिती दिनांक १९ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच जळगाव जिल्हयात गत वर्षात १७१ शेतक-यांच्या आत्महत्या झाल्या असून आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या वारसांनी दाखल केलेल्या मदतीसाठीचे ९० प्रस्ताव जिल्हास्तरीय समितीने अपात्र ठरविले आहेत व ३० प्रस्ताव प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, नापिकी, अतिवृष्टी, कर्जबाजारीपणा आणि शेतमालांचे पडणारे भाव हीच येथील शेतकऱ्यांच्या आत्महत्येमागील प्रमुख कारणे असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणांची चौकशी करुन आत्महत्याग्रस्त कुटूंबाला आर्थिक मदत करण्याबाबत व या जिल्हयातील शेतकऱ्यांच्या वाढत्या आत्महत्या रोखण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) होय खरे आहे.

(३) जळगांव जिल्ह्यात सन २०१६ या वर्षात एकूण १७१ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असून त्यापैकी जिल्हास्तरीय समितीमार्फत ५५ प्रकरणे पात्र, तर १०४ प्रकरणे अपात्र ठरविण्यात आली असून १२ प्रकरणे चौकशीस्तव प्रलंबित आहेत.

(४) अंशत: खरे आहे.

(५) शासन निर्णय दि.२३.१.२००६ अन्वये शेतकरी आत्महत्यांच्या प्रकरणांमध्ये रू.१ लक्ष इतकी आर्थिक मदत आत्महत्याग्रस्त कुटूंबाला देण्यात येते. वाढत्या शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी यवतमाळ व उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये प्रायोगिक तत्वावर बळीराजा चेतना अभियान राबविण्यात येत असून कै.वसंतराव नाईक शेतकरी स्वावलंबन मिशन अंतर्गत अमरावती व मराठवाडा विभागातील सर्व जिल्हे व नागपूर विभागातील वर्धा जिल्हा अशा १४ जिल्ह्यांमध्ये शेतकरी आत्महत्या रोखणेबाबतच्या उपाययोजना राबविण्याबद्दल कार्यवाही करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जयगड (जि.रत्नागिरी) येथील मे. जिंदल उदयोग समूहाने मच्छिमारांची केलेली फसवणूक

**(४०) * ७४१७८ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जयगड (ता.जि.रत्नागिरी) येथील मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थेने मे. जिंदल पोर्टच्या वाढीव ब्रेकवॉटर वॉलच्या वाढीव बांधकामामुळे मच्छीमार हे आर्थिक नुकसानीपासून वंचित राहिल्याने त्यांना सन २०१४ पासूनची नुकसान भरपाई मिळावी, कंपनीने मान्य केल्याप्रमाणे प्रक्रिया केलेले गरम पाणी खोल समुद्रात सोडण्यात यावे, कंपनीतून उडणाऱ्या राखेमुळे नागरिकांना श्वसनाचे विकार जडले असून या राखेचा बंदोबस्त करण्यात यावा, छोटया मच्छिमारांना मान्य केलेली नुकसान भरपाई देण्यात यावी यासह अशा विविध ११ मागण्यांचे निवेदन मे. जिंदल उदयोग समूहाला सन २०१४ मध्ये दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कंपनीकडून मान्य केलेल्या मागण्यांची पूर्तता न झाल्याने जयगड मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थेने माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान आमरण उपोषणाचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सर्वसामान्य मच्छिमारांची फसवणूक करणाऱ्या मे. जिंदल उदयोग समुहावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) सदर निवेदन महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डास प्राप्त झालेले नाही.

(२) होय

(३), (४) व (५) मच्छिमारांना नुकसान भरपाई देण्यासंदर्भात अभ्यास करण्यासाठी मेसर्स जेएसडब्ल्यू जयगड पोर्ट लिमिटेड यांच्यामार्फत सेंट्रल मरीन फिशरीज रिसर्च इन्स्टीट्युट (CMMRI) कोचीन या संस्थेची नियुक्ती करण्यात आली आहे. हया संस्थेकडून अभ्यास अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्याबाबत जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांच्या अध्यक्षतेखालील समितीत निर्णय घेण्यात येईल. त्यामुळे करारनामा रद्द करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## घोटी-सिन्नर-शिर्डी-औरंगाबाद या रस्त्याकरिता संपादीत केलेल्या जमिनींचा शेतकऱ्यांना वाढीव मोबदला देण्याबाबत

**(४१) * ७८६४६ श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे वावी व आगासखिंड तसेच कृषी उत्पन्न बाजार समिती (ता. सिन्नर जि.नाशिक) येथील सुमारे १४ शेतकऱ्यांच्या शेतजमिनी घोटी-सिन्नर-शिर्डी-औरंगाबाद या रस्त्याकरिता संपादित करण्यात आल्या असून सदर जमिनींचा वाढीव मोबदला अद्यापपावेतो त्यांना देण्यात आला नसल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी संबंधिताना वाढीव मोबदला लवकरात लवकर देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा. सार्वजनिक बांधकाम मंत्री यांचेकडे लेखी पत्राद्वारे दिनांक २५ जानेवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनामार्फत कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) मा.न्यायालयाच्या आदेशानुसार प्रस्तुत प्रकरणी भुसंपादनापोटी वाढीव मोबदला संबंधीतांना लवकरात लवकर अदा करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## नांदेड जिल्हयात नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना एनडीआरएफच्या निकषानुसार निविष्ठा अनुदान मिळण्याबाबत

**(४२) * ७६२२७ श्रीमती अमिता चव्हाण (भोकर) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हयात पेरणीनंतर पडलेला पावसाचा खंड आणि नंतर सततच्या पावसाने उत्पादनाच्या टप्प्यातील पिकांचे नुकसान झाल्याने या वर्षीही खरीप पिकांचे उत्पादन घटल्याचे जाहिर करण्यात आलेल्या आणेवारीवरुन माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना एनडीआरएफच्या निकषानुसार निविष्ठा अनुदान मिळण्याची तरतूद असल्याने ३३ टक्के शेती पिकांचे नुकसान झालेल्या नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

(२) महसुल व वन विभाग शासन निर्णय क्र. सीएलएस-२०१६/प्र.क्र.३२४/म-३ दिनांक ९ जानेवारी, २०१७ अन्वये अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या शेतक-यांना मदत जाहीर करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## विदर्भातील अप्पर वर्धा धरण प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्याबाबत

**(४३) * ७५६४२ श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भातील तीन जिल्हयातील हजारो एकर जमिनीवर व्यापलेल्या अप्पर वर्धा धरण प्रकल्पामध्ये प्रकल्पग्रस्तांना कोणताही लाभ मिळालेला नसून त्यांची शेती गेल्याने आणि त्यांना घरेही मिळाली नसल्याने त्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून प्रकल्पग्रस्तांचे योग्यप्रकारे पुनर्वसन शासनाने करावे यासाठी प्रकल्पग्रस्तांनी आझाद मैदानात बेमुदत ठिय्या आंदोलन सुरु केले असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्याअनुषंगाने प्रकल्पग्रस्तांना योग्य मोबदला देऊन यांचे पुनर्वसन करण्याबाबत व विलंबास जबाबदार असणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय

(२) अप्पर वर्धा प्रकल्पांतर्गत सर्व प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्यात आले आहे. पुनर्वसित गावठाणातील नागरी सुविधा जिल्हा परिषदेकडे हस्तांतरित केलेल्या आहेत. पात्र प्रकल्पग्रस्तांना लाभक्षेत्रातील देय पर्यायी जमिनीचे वाटप करण्यात आलेले आहे.

(३) अप्पर वर्धा प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन यापुर्वीच करण्यात आले आहे. त्यामुळे अधिकाऱ्यांवर कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्याकरीता**
**प्रभावी उपाययोजना करण्याबाबत**

**(४४) * ७४२९४ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भातील १४ हजार २०२ आत्महत्यांपैकी केवळ ६ हजार ८५२ प्रकरणेच मदतीसाठी पात्र ठरविण्यात आली असून उर्वरित ७ हजार, ३५० आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटूंबांना शासनाच्या अटी व शर्तीमुळे मदतीपासून वंचित राहावे लागल्याची बाब माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उर्वरित अपात्र आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटूंबांना तातडीने मदत देण्याबाबत लोकप्रतिनिधींनी दिनांक १२ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा.महसूल मंत्री यांना पत्राद्वारे विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यावर्षी अमरावती जिल्हयात ३६० दिवसात ३४० शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याबाबत तसेच अमरावती विभागासह वर्धा जिल्हयात सन २००१ ते २०१६ या कालावधीत १३ हजार ४५६ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असुन त्यामधील ५ हजार ९१६ प्रकरणे पात्र व ७ हजार ४४२ प्रकरणे अपात्र, ९९ प्रकरणे चौकशीसाठी प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, बुलढाणा जिल्ह्यात माहे जानेवारी, २०१६ ते नोव्हेंबर, २०१६ या कालावधीत २१७ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असून त्यापैकी ६१ शेतकऱ्यांनी नापिकीमुळे, ६१ शेतकऱ्यांनी कर्जबाजारीपणामुळे व ८७ शेतकऱ्यांनी इतर कारणास्तव आत्महत्या केल्याबाबतचा अहवाल जिल्हा प्रशासनाने शासनास सादर केला आहे, हे ही खरे आहे

(५) असल्यास, विदर्भातील शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याबाबत तसेच शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

अमरावती विभागामध्ये १२०८१ शेतकरी आत्महत्यांची प्रकरणे झाली असून त्यापैकी ५२४८ प्रकरणे पात्र व ६८०५ प्रकरणे अपात्र ठरविण्यात आली आहेत.

नागपूर विभागामध्ये ३६८ शेतकरी आत्महत्यांची प्रकरणे झाली असून त्यापैकी २०४ प्रकरणे पात्र व १३७ प्रकरणे अपात्र ठरविण्यात आली आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) हे अंशत: खरे आहे.

अमरावती जिल्ह्यात ३६० दिवसांत ३४० शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या असून अमरावती विभागासह वर्धा जिल्ह्यात सन २००१ ते २०१६ या कालावधीत आजतागायत १३५१७ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असून त्यापैकी ५९५० प्रकरणे पात्र व ७५०५ प्रकरणे अपात्र तर ६२ प्रकरणे चौकशीकरिता प्रलंबित आहेत.

(४) बुलढाणा जिल्ह्यात माहे जानेवारी, २०१६ ते नोव्हेंबर, २०१६ या कालावधीत २१९ शेतकऱ्यांनी केलेल्या आत्महत्यांपैकी ६४ शेतकऱ्यांनी नापिकीमुळे तर ६० शेतकऱ्यांनी कर्जबाजारीपणामुळे आत्महत्या केलेल्या आहेत.

(५) शासन निर्णय दि.२३.१.२००६ अन्वये शेतकरी आत्महत्यांच्या प्रकरणांमध्ये रू.१ लक्ष इतकी आर्थिक मदत आत्महत्याग्रस्त कुटूंबाला देण्यात येते. वाढत्या शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी यवतमाळ व उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये प्रायोगिक तत्वावर बळीराजा चेतना अभियान राबविण्यात येत असून कै.वसंतराव नाईक शेतकरी स्वावलंबन मिशन अंतर्गत अमरावती व मराठवाडा विभागातील सर्व जिल्हे व नागपूर विभागातील वर्धा जिल्हा अशा १४ जिल्ह्यांमध्ये शेतकरी आत्महत्या रोखणेबाबतच्या उपाययोजना राबविण्याबद्दल कार्यवाही करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे खैरे-आंबिवली (ता.वाडा, जि.पालघर) या इको सेन्सिटीव्ह क्षेत्रातील अवैध उत्खनन

**(४५) * ७९७१३ श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे खैरे-आंबिवली (ता.वाडा, जि.पालघर) हे गांव इको सेन्सिटीव्ह झोन क्षेत्रात येत असतानाही मे. वेलंकनी स्टोन क्रशर कंपनी या गावात शासकीय नियमांचे उल्लंघन करुन अवैधपणे उत्खनन करीत असल्याने गावांतील घरांना व विहीरींना तडे गेले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचे उत्खनन खैरे या गावातील गुरचरण या जागेत सन २००७ पासून अनधिकृतपणे सुरु असून कंपनीने शासनाच्या करोडो रुपयांच्या महसूलाचेही नुकसान केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कंपनीकडून महसुलाची वसूली करुन कंपनी बंद करण्याबाबत व क्रशर मालकांविरुध्द कारवाई करण्याबाबतची मागणी लोकप्रतिनिधी-भिवंडी पूर्व यांनी मा.महसूल मंत्री व मा.महसूल राज्यमंत्री यांच्याकडे दिनांक १४ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार अनधिकृतपणे उत्खनन करुन शासनाचा करोडो रुपयांचा महसूल बुडविणाऱ्या सदर कंपनीविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३), (४) व (५) प्रश्न भाग ३ मध्ये नमूद आशयाच्या दिनांक १४/१२/२०१६ रोजीच्या लोकप्रतिनिधींकडून प्राप्त निवेदनाच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली आहे. सदर चौकशीत, केंद्र शासनाने दिनांक १० मार्च, २०१४ रोजी प्रसिध्द केलेल्या प्रारुप अधिसूचनेसोबतच्या परिसंवेदनशील गावांच्या यादीमध्ये मौजे खैरे-आंबिवली, ता. वाडा या गावाचा समावेश असल्याचे निष्पन्न झाले. मौजे खैरे-आंबिवली या गावामध्ये सन २००७ मध्ये १० वर्ष कालावधीसाठी ५ खनिपट्टे रितसर मंजूर करण्यात आले असून, सदर खनिपट्टयातील उत्खननामुळे घरांना तसेच विहिरींना तडे गेल्याचे निदर्शनास आले नाही. तसेच सदर खाणपट्टयाची जमीन गुरचरण असल्याचे निदर्शनास आले नाही.

सदर खनिपट्टाधारकांनी केलेल्या उत्खननाची ऑक्टोबर, २०१५ मध्ये मोजणी केली असता, खनिपट्टाधारकांनी शासनजमा केलेल्या स्वामित्वधनापेक्षा जास्त उत्खनन केल्याचे निदर्शनास आल्यानुसार त्यांच्याविरुध्द तहसीलदार वाडा यांच्याकडून दंडात्मक कारवाई करण्यात आली होती. सदर कारवाईविरुध्द संबंधितांनी उप विभागीय अधिकारी वाडा यांच्यासमोर अपील अर्ज दाखल केले असता, सदर अपील अर्जामध्ये उप विभागीय अधिकारी वाडा यांनी फेरमोजणी करुन, नियमानुसार योग्य ती कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**आंबेगाव (जि. पुणे) तालुक्यातील कळंब-साकोरे-कडेवाडी-चास या रस्त्याची झालेली दुरावस्था**

**(४६) * ७६९०३ श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आंबेगाव (जि. पुणे) तालुक्यातील कळंब-साकोरे-कडेवाडी-चास या रस्त्याची अत्यंत दुरावस्था झाली असून रस्त्यावर अनेक ठिकाणी मोठे खड्डे पडल्याने वारंवार अपघात होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १२ जानेवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांच्याकडे निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे तसेच जि.प. बांधकाम विभाग, पुणे यांच्याकडे गत चार महिन्यांपासून वारंवार तक्रारी करुनही कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन रस्ता तातडीने दुरुस्त करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय, हे अंशतः खरे आहे.

कळंब साकोरे प्रजिमा-१३ व कडेवाडी-चास प्रजिमा-४८ हे रस्ते सार्वजनिक बांधकाम विभाग अंतर्गत असून सदर रस्त्यावरील खड्डे भरुन रस्ता सुस्थितीत आहे.

कडेवाडी साकोरे रस्ता ग्रामीण मार्ग क्र. ७ या रस्त्याची २.५ कि.मी. ची लांबी व कडेवाडी साकोरी रस्ता ग्रा.मा. ७ (अ) ही २.५० कि.मी. ची लांबी हे दोन्ही रस्ते प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेच्या अखत्यारित येत असून, त्याबाबतची पुढील कार्यवाही ग्राम विकास विभागाकडून करण्यात येत आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## यवतमाळ येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी केलेला गैरव्यवहार

**(४७) * ७४३४३ डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सार्वजनिक बांधकाम विभाग, यवतमाळ यांनी माहे डिसेंबर, २०१६ ते जानेवारी, २०१७ या कालावधीमध्ये रस्ते, इमारती व पूल इत्यादी बांधकामांच्या मोठ्या कामांचे ३ लाखांच्या छोट्या कामात रुपांतर करून व विनानिविदा प्रक्रिया सदर कामे करून गैरव्यवहार केल्याचे दिनांक १८ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच धारमोहा (जि.यवतमाळ) येथील पूलाच्या बांधकामासाठी नाल्यातील ५०० ब्रास निकृष्ट आणि मातीमिश्रित वाळूचा वापर करुन सदर पूलाचा पाया भरण्याचे काम सुरु केले असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शासनाच्या मार्गदर्शक तत्वांकडे दुर्लक्ष करून सदर कामे करणाऱ्या संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राजूर (ता.भोकरदन, जि.जालना) येथे टँकरमधून विषारी वायूची गळती झाल्याने पिकांचे झालेले नुकसान

**(४८) * ७८६०२ श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हैद्राबादहून रसायनयुक्त विषारी वायू घेऊन गुजरातकडे जाणा-या टँकरमधून भोकरदन (जि.जालना) रस्त्यावर राजूरजवळ दिनांक १८ जुलै, २०१६ रोजी वा त्यासुमारास वायू गळती झाल्याने खरिपातील २०० हेक्टर लागवड केलेली कपाशी, सोयाबीन, मका, बाजरी आदी पिके जळून नष्ट झाली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू पिकांचा पंचनामा झाल्यानंतर ७ महिन्यांचा कालावधी झालेला असताना अद्यापही शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळाली नसल्याचे माहे जानेवारी २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) अंशत: खरे आहे.

क्लोरोसल्फ्युरिक ॲसिड या केमिकलची वाहतूक करणा-या टँकरमधून गळती झाल्यामुळे एकूण २१.३० हे. क्षेत्र बाधित झालेले आहे.

(२) टँकरमधून विषारी वायूची गळतीमुळे पिकांचे झालेले नुकसान ही बाब नैसर्गिक आपत्तीच्या (SDRF/NDRF) निकषात बसत नाही. त्यामुळे सदर नुकसानीस मदत अनुज्ञेय नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### खालापूर (जि.रायगड) येथील सावरोली खारपाडा मार्गावरील दगडखाण बंद करण्याबाबत

**(४९) * ७४५३४ श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी), श्री.अजित पवार (बारामती), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खालापूर (जि.रायगड) तालुक्यातील सावरोली खारपाडा मार्गावर माडप गावाच्या हद्दीत असलेल्या यशोदा स्टोन सप्लाय दगडखाण व स्टोन क्रशर या दगडखाणीतील सप्लाय व क्रशरमुळे आसपासच्या घरांच्या भिंतीला तडे गेले असून लगतची शेतजमीन नापिक झाली असल्याचे माहे जानेवारी २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई पुणे द्रुतगती मार्गावरील माडप बोगद्याजवळ सदर दगडखाण असल्यामुळे हादरे बसून सदर बोगदा खचत जावून मोठी दुर्घटना होण्याची शक्यता निर्माण झाली आहे तसेच सदर दगडखाणीकरिता महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाची कोणतीही परवानगी घेतली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत माडप गावातील ग्रामस्थांनी व सामाजिक कार्यकर्त्यांनी मा. मुख्यमंत्री यांना सदर दगडखाण बंद करण्याबाबत निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, सदर चौकशीच्या अनुषंगाने यशोदा स्टोन सप्लाय दगडखाण व स्टोन क्रशर यांच्या विरुध्द कारवाई करुन दगडखाण बंद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३), (४) व (५) मौजे माडप, ता. खालापूर येथील ग्रामस्थाचे मौजे माडप गावात सुरु असलेले बेकायदेशीर दगडखाण व स्टोन क्रशर बंद करण्याबाबतचे निवेदन शासनाकडे जानेवारी, २०१७ मध्ये प्राप्त झाले आहे.

उप विभागीय अधिकारी खालापूर विभाग व तहसिलदार खालापूर यांनी मुंबई-पुणे द्रुतगतीमार्गावरील माडप बोगद्याची पाहणी केली असून, दगडखाणीतील प्रत्यक्ष उत्खनन क्षेत्र व उक्त बोगद्याचे सुरुवातीचे ठिकाण यामधील अंतर ५०२ मीटर असल्याचे दिसून आले आहे.

सदर भागात घरांच्या भिंतींना गेलेले तडे दगडखाणीतील स्फोटामुळे गेले किंवा कसे, तसेच माडप येथील बोगद्याला दगडखाणीमुळे धोका संभवतो किंवा कसे, याबाबत डायरेक्टर जनरल ऑफ माईन्स सेफ्टी, जियॉलॉजीकल सर्वे ऑफ इंडिया व महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांच्याकडून अहवाल

मागविण्यात आला आहे. सदर अहवाल प्राप्त होताच नियमानुसार उचित कार्यवाही करण्याची तजवीज ठेवली आहे.

सदर दगडखाणीच्या आसपास डोंगराळ व पडीक जमीन असल्याने शेतजमीन नापीक होण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**वरूड (जि.अमरावती) तालुक्यातील ७३२ शेतकऱ्यांचे दोन कोटीचे अनुदान रद्द झाल्याबाबत**

**(५०) * ७६५०४ डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), डॉ.अनिल बोंडे (मोर्शी), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरूड (जि.अमरावती) तालुक्यातील संत्रा उत्पादक ७३२ बगायती शेतकऱ्यांना सन २०१४-१५ मध्ये ठिबक सिंचन व तुषार सिंचन योजनेअंतर्गत देण्यात आलेले सुमारे २ कोटी रूपयांचे अनुदान कृषी विभागाने रद्द केल्यामुळे त्यांना अनुदान मिळाले नसल्याबाबतची बाब माहे डिसेंबर २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यावर्षी सन २०१६-१७ मध्ये २ हजार ९१० ऑनलाईन प्रकियेतुन आलेल्या लाभार्थ्यांना ३ कोटी २१ लक्ष ५७ हजार रूपयाचे अनुदान प्राप्त झाले असून तत्पूर्वीच्या अर्ज केलेल्या शेतकऱ्यांचे अनुदान रद्द करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संत्रा उत्पादक बागायती शेतकऱ्यांना अनुदान देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) नाही. उपलब्ध अनुदानाच्या मर्यादेत प्राप्त प्रस्तावांना प्राथम्यक्रमानुसार पूर्वसंमती देण्यात येते. पूर्वसंमती देण्यात आल्यानंतर ज्या शेतकऱ्यांनी सुक्ष्म सिंचन संच बसविले आहेत अशाच शेतकऱ्यांना अनुदान देण्यात येते. वरुड तालुक्यासाठी सन २०१४-१५ या वर्षात रु.१४३.५१ लक्ष एवढा निधी उपलब्ध करुन देण्यात आला होता. उपलब्ध अनुदानाच्या मर्यादेत ५१९

शेतकऱ्यांना पूर्वसंमती देवून अनुदानाची रक्कम शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर जमा करण्यात आली आहे.

(२) वरुड (जि.अमरावती) तालुक्यात सन २०१६-१७ या वर्षात २३४२ लाभार्थ्यांचे अर्ज पात्र ठरले असून आजअखेर रु.३२९.८७ लाख एवढा निधी उपलब्ध करुन दिला आहे.

सन २०१६-१७ पूर्वी, पूर्वसंमती दिल्यानंतर ज्या शेतकऱ्यांनी सुक्ष्म सिंचन संच बसविलेत अशा सर्व शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर अनुदानाची रक्कम जमा करण्यात आली आहे. पूर्वसंमती नसतांना परस्पर सुक्ष्म सिंचन संच बसविलेल्या लाभार्थ्यांना अनुदान देय नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.